कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ९ जुलै २०२४

किंमत ४ ₹

## शरद पवार गटाला मान्यता

**नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मागणीला मान्यता दिली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्षाला लोकसभा निवडणुकीत वापरलेले तुतारी चिन्ह आगामी विधानसभा निवडणुकीसही वापरण्यास मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीतही शरद पवार गटाचं आता तेच चिन्हं असणार आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच शरद पवार यांच्या पक्षाला आता पान २ वर




**आजचा अग्रलेख**
**एकनाथरावांचा रमणा**

# मुसळधार पावसाचे थैमान

## समुद्र खवळला, जनजीवन विस्कळीत

## शाळा, महाविद्यालयांना सुट्टी; अनेक घरांत पाणी



। अलिबाग । प्रमोद जाधव । राज्यासह कोकणात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाने सुरुवात केली आहे. कोकणात अनेक भागात सतर्क राहण्याच्या सूचना जिल्हा प्रशासन आणि आपत्ती विभागांकडून देण्यात आलेल्या आहेत. रायगडच्या समुद्राला उधाण आले आहे. दुपारनंतर समुद्रामध्ये उंच लाटा उसळणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होताच. काही तासांमध्ये पावसाचा जोर वाढला तर समुद्र आणखी खवळेल असा अंदाजही वर्तवला आहे. दरम्यान, मच्छिमारांना अजिबात समुद्रात जाऊ नये अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यासाठी मंगळवारी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून विजांच्या कडकडाटासह वाऱ्यांचा वेग ५०-६० किमी प्रति तास राहण्याचा अंदाज आहे. रेल्वे आणि विमान सेवा ठप्प झाली होती. रायगड जिल्ह्याला सकाळपासून मुसळधार पावसानं हजेरी लावली. तसेच सोमवारी रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट जारी करण्यात आला होता. महाड तालुक्यातील किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या किल्ले रायगडवाडी येथील युवक काल दुपारी किल्ले रायगडाच्या शेजारी असणाऱ्या धबधब्यावरून वाहून गेला. त्यानंतर जिल्ह्यात पुन्हा एकदा प्रशासनानकडून सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला. गेल्या अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांसह जिल्ह्यातील नागरिक पावसाच्या प्रतिक्षेत होते. अखेर रविवारी पावसाने हजेरी लावली. सायंकाळपासून सुरू झालेल्या पावसाने रात्रभर थैमान घातला. नद्या, शेत पाण्याने तुडुंब भरून गेले. अलिबागसह पनवेलमधील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने घरातील विद्युत साहित्य, धान्य व कपडे भिजून प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे लाखोंची वित्तहानी झाल्याची माहिती समोर येत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ८३.२ टक्के पाऊस पडला आहे. सरासरी २५९.१ मिमी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वात जास्त म्हसळा, मुरूड, अलिबाग, महाड, खालापूर, पोलादपूर, पेण, माणगाव, श्रीवर्धन आदी तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आहे. चोवीस तासामध्ये अलिबागमध्ये १७० मिमी. मुरूडमध्ये २५५ मिमी. तळामध्ये २८७ मिमी. म्हसळामध्ये २७३ मिमी., श्रीवर्धनमध्ये १३१ मिमी., पनवेलमध्ये ९० मिमी. पाऊस पडला आहे. या पावसामुळे अलिबाग, मुरूड तालुक्यातील नद्या, नाल्यांमधील पाण्याची पातळी वाढ झाली.पनवेल तालुक्यातील तोंडरे येथे काही घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले. रात्रीपासून पावसाचा जोर सुरु राहिल्याने अनेक घरांमध्ये पाणी शिरले. पान २ वर

### दुचाकी गेली वाहून

अलिबाग– रेवदंडा मार्गावरील पाल्हे पुलावरून पाणी वाहू लागले. दरम्यान एक दुचाकी पुलावरून वाहून गेली. भीमेश्वर तळ्याची भिंतदेखील कोसळली आहे. नागरिकांना सतर्कतेचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### एनडीआरएफ सज्ज

असाच पाऊस सुरु राहिल्यास दरड कोसळ्याबरोबरच पुरपरिस्थिती निर्माण होण्याची भिती आहे. त्यामुळे मदतीसाठी एनडीआरएफ पथक सज्ज असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. तसेच शासकीय यंत्रणांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला.

## किल्ले रायगड ३१जुलैपर्यंत बंद

। नाते । वार्ताहर ।

रायगड परिसरात रविवारी झालेल्या ढगफुटीसदृश्य तुफानी पावसाने शेकडो पर्यटकांना तातडीने गडावरून खाली यावे लागले. शासनाने दिलेल्या आगामी चार दिवसांमधील पावसाच्या इशारा संदर्भात येत्या ३१ जुलैपर्यंत किल्ले रायगडवर जाणारा पायरी मार्ग तसेच रोपवे बंद राहणार असल्याची माहिती महाड तालुका पोलीस निरीक्षक राजेंद्र मायने व रायगड प्राधिकरणचे प्रमुख यांच्यामार्फत देण्यात आली आहे.

दरम्यान, सोमवारी (दि.८)



सकाळी पायरी मार्ग बंद करण्यापूर्वी गडावर गेलेल्या पान २ वर

### एकजण वाहून गेला

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या रायगड वाडी येथील रहिवासी मनोज खोपकर हे टकमक टोकाच्या परिसरामध्ये असणाऱ्या धबधब्याच्या नजीक आपल्या मित्रपरिवारांसह गेले असताना वाहून गेल्याची माहिती स्थानिक ग्रामस्थांकडून रविवारी (दि.७) सायंकाळी उशिरा प्राप्त झाली.

## वेधक

### चारधाममध्ये ६ हजार भाविक अडकले

**उत्तराखंड :** उत्तराखंडमध्ये गेल्या चार दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे केदारनाथ आणि बद्रीनाथ महामार्गासह ११५ हून अधिक रस्ते बंद आहेत. भूस्खलनामुळे अनेक रस्ते बंद झाले तर काही वाहून गेले. यानंतर चार धाम यात्रा थांबवण्यात आली. त्यामुळे ६ हजार भाविक ठिकठिकाणी अडकून पडले आहेत. गंगा, अलकनंदा, भागीरथीसह अनेक नद्या धोक्याच्या चिन्हाजवळून वाहत आहेत. हिमाचल प्रदेशातही मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे ७६ रस्ते बंद झाले आहेत. पश्चिम बंगालच्या हिमालयाच्या पायथ्याशी पूरस्थिती निर्माण झाली आहे. गोव्यातील सातारी तालुक्यातील पाली फॉल्स येथे ८० लोक अडकले होते, त्यांची रविवारी सुटका करण्यात आली. आसाममध्ये पूरस्थिती गंभीर आहे. पान २ वर

### एमपीएससी परीक्षेला अतिवृष्टीचा फटका

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी)सोमवारी (दि.८) टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्यात आली होती. मुंबईमध्ये ही परीक्षा होत आहे. मात्र मुंबईत होत असलेल्या अतिवृष्टीचा फटका या परीक्षेला बसला आहे. त्यामुळे एमपीएससीने तातडीने उपाययोजना केली आहे. कौशल्य टंकलेखन परीक्षेसाठी राज्यभरातून उमेदवार मुंबईत दाखल झाले. एकूण चार सत्रांमध्ये ही परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र मुंबईत अतिवृष्टी सुरू असल्याने या परीक्षेचे नियोजन बाधित झाले. त्यामुळे या परीक्षेबाबत आयोगाने तातडीने उपाययोजना केल्या आहेत. या संदर्भात एमपीएससीने एक्स या समाजमाध्यमातील अधिकृत खात्याद्वारे माहिती दिली. मुंबईमध्ये अतिवृष्टीमुळे रेल्वे सेवा व इतर वाहतूक सेवा काही प्रमाणात विस्कळीत झाल्याने आयोगामार्फत आयोजित चारही सत्रांची टंकलेखन कौशल्य चाचणी ही नियोजित वेळेपेक्षा ४५ मिनिटे उशिराने सुरू करण्याचा निर्णय आयोगाने घेतला. तसेच उमेदवारांना परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्याची अंतिम वेळ प्रत्येक सत्राकरिता ४५ मिनिटांनी वाढवण्यात आली, पान २ वर



## अलिबाग - रोहा रस्ता खचला

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मोठा गाजावाजा करीत अलिबाग-रोहा रस्त्याचे काम मागील वर्षी एप्रिल महिन्यात सुरु करण्यात आले. मात्र पहिल्याच पावसात हा रस्ता खचून गेला. त्यामुळे या रस्त्यावरील कामाच्या दर्जाबाबत शंका निर्माण होत आहे.

२२ एप्रिल २०२३ रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अलिबाग- रोहा रस्त्याचे काम सुरु करण्यात आले. शिंदे गट आणि भाजपमध्ये या कामाबाबत श्रेयवाद निर्माण झाला होता. बेलकडे फाट्यापासून कारपेट टाकण्याचे काम सुरु झाले. त्यामुळे पावसाळ्यात या मार्गावरील प्रवास सुखकर होण्याची आशा होती. मात्र पहिल्याच पावसात या मार्गावरील रस्ता खचल्याने प्रवाशांची घोर निराशा झाली आहे.

सहाण ते सहाण बायपास रस्त्याच्या बाजूकडील रस्ता खचला आहे. कार्विर-सहाण गोठी जवळील मोरी तुटल्याने रस्ता पाण्यात जाण्याची भिती निर्माण झाली आहे. वढाव ते कुंठ्याची गोठी दरम्यान रस्ता पूर्णतः खचला आहे. रस्त्यावर टाकलेले कारपेट पूर्णतः निघाले पान २ वर

## सिंधुदुर्गात ४०० नागरिकांचे स्थलांतरण

। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।

मुसळधार पावसाने सिंधुदुर्गवासियांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. सावंतवाडी तालुक्यात मुसळधार पावसाने अक्षरशः थैमान घातले. सावंतवाडी आणि कुडाळ तालुक्यातील तेरेखोल तसेच कर्ली नदी दुथडी भरून वाहत आहेत. कुडाळ तालुक्यात मागील २४ तासांपासून दमदार पावसाला सुरुवात झाली आहे. पावशी आणि ओरोस येथे महामार्गावर पाणी आले होते. तर वेताळ बांबरडे गावात घरांना पाण्याचा वेढा पडला होता.



काही बाजारपेठेत पाणी शिरले होते. ऑरेंज अलर्ट असून खबरदारी म्हणून एनडीआरएफचे एक पथक जिल्ह्यात बोलवण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांना आज सुट्टी ही देण्यात आली आहे.

कुडाळ शहरानजिक असलेल्या पावशी गावाला पुराच्या पाण्याने वेढा दिला आहे. या पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांचे रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले आहे. यासाठी एनडीआरफची टीम मागवण्यात आली आहे. या टीम सह कुडाळचे तहसीलदार विरसिंग वसावे स्वतः या बचावकार्यात उतरले आहेत. आतापर्यंत ४०० जणांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. पान २ वर

### मंत्र्यांनाच पावसाचा फटका

**मुंबई :** मुंबईतल्या मुसळधार पावसाचा फटका आमदारांना बसला आहे. अधिवेशनसाठी अनेक आमदार एक्स्प्रेसमधून मुंबईकडे येत होते. पण, जोरदार पावसामुळे रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांसोबत आमदारांनादेखील सहन कराला लागला. विदर्भ, अमरावती एक्स्प्रेस कुर्ला, घाटकोपर दरम्यान अडकली. यावेळी मराठवाडा आणि विदर्भातील १० ते १२ पान २ वर

## पहिल्याच पावसात युती सरकारचे पितळ उघडे

- चुल्लूभर पानी में मुंबई को डूबा दिया
- काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांची टिका



। मुंबई । प्रतिनिधी ।

सरकारी कार्यालयातील महिला व पुरुषांना घरी जाताना पावसाचा फटका बसु नये, म्हणून सोमवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे कामकाज दिवसभराकरिता तहकूब करण्यात आले होते. मुंबई व उपनगरातील परिस्थिती पहिल्याच पावसाने अत्यंत भयावह झाली आहे. मुंबई व उपनगरातील अनेक भाग पाण्याने तुडुंब भरले. रेल्वे व रस्ते वाहतूक ठप्प होऊन मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. महानगरपालिका व रेल्वे प्रशासन यांच्यात कसलाही समन्वय नाही तर दुसरीकडे भ्रष्टाचारामुळे मुंबईकरांना शिंदे सरकारच्या पापाची फळे भोगावी लागत आहे. एकाच पावसात देशाची आर्थिक राजधानी पाण्याखाली जाते हे अत्यंत गंभीर आहे. पावसाने शिंदे-फडणवीस-अजित पवार सरकारचे पितळ उघडे पाडले असून महाभ्रष्ट्युती सरकारने, चुल्लूभर पानी में मुंबई को डुबा दिया, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

मुंबई महानगर पालिकेचे कारभारी स्वतः मुख्यमंत्री आहेत पण चुकीच्या व्यक्तीच्या हातात राज्याची सूत्रे असल्याने मुंबई व महाराष्ट्राला त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. महापालिकेच्या कार्यालयात दोन पालकमंत्र्यांची कार्यालये मुंबईकरांच्या कष्टाचे पैसे खाण्यासाठी काढली आहेत का? असा संतप्त सवाल विचारून स्वतःच्या अपयशाचे खापर मुख्यमंत्री पावसावर फोडत आहेत. मुंबईत झालेला पाऊस हा काही पहिल्यांदाच झालेला नाही. यापेक्षा मोठा पाऊस मुंबईत पान २ वर



## चित्रलेखा पाटील मदतीला धावल्या

### नेहुली येथील नुकसानग्रस्तांना दिला आधार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रात्रीपासून सुरु असलेल्या पावसामुळे नेहुली गावातील काही घरांमध्ये पाणी शिरले. शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी सोमवारी नुकसानग्रस्तांच्या घरी जाऊन त्यांची विचारपूस केली. त्यानंतर त्यांना आर्थिक मदतीचा हात दिला. चित्रलेखा पाटील नुकसानग्रस्तांच्या मदतीला धावल्याने त्यांचे सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील विशाल पाटील, अनिल पाटील, दिलीप पाटील यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या घरात पाणी शिरले. तीन ते चार फुट पाणी घरात पान २ वर

### युवराज पाटील यांनी घेतली नुकसानग्रस्तांची भेट

रात्रीपासून सुरु असलेल्या पावसात रामराज परिसरातील अनेक गावांतील घरांमध्ये पाणी शिरले होते. रामराज, उमटे, बोरघर, आदी गावांना शेकापचे युवा नेतृत्व युवराज पाटील यांनी भेट दिली. भिलजी गावातील माऊली मंदीर, रामराज कोळीवाडा मराठ आळीतील घरांमध्ये पाणी शिरल्याची पाहणी केली. तसेच उमटे येथील अनिल भोईर यांच्या गणपतीच्या कारखान्यात माती, पाणी घुसल्याने नुकसान झाले. तसेच तेथील तळ्याची भिंतदेखील पान २ वर



# कर्जत तालुक्यातील धबधबे पर्यटकांनी फुल

## माथेरानच्या धबधब्यावर पर्यटकांची विशेष गर्दी



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील धबधब्यावर आज ७ जुलै रोजी पर्यटकांची गर्दी उसळली होती.विकेंड सुट्टी असल्याने मान्सूनचा आनंद घेण्यासाठी म्हणून आज पर्यटकांनी ही गर्दी तालुक्यातील प्रसिध्द अशा धबधब्यावर केली होती.माथेरान या पर्यटनस्थळी येथील धबधबे तर भिवपुरी येथील अशाने कोषाणे येथील धबधब्यावर पर्यटकांची गर्दी दिसून आली. दरम्यान या गर्दीमुळे रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या तर धबधबे पर्यटकांच्या गर्दीने फुलून गेले होते.

पर्यटन दृष्टीने कर्जत तालुका पुढारला आहे. त्यामुळेच विकेंडला पर्यटकांची मोठी गर्दी तालुक्यात उसळत आहे.तालुक्यातील फार्महाऊस,इतिहासकालीन गडकिल्ले तर लेणी हे पर्यटकांचे येथील मुख्य आकर्षण बनले आहे त्यातच तालुक्यातील सह्याद्रीच्या डोंगर कुशीतून मान्सून काळात वाहणारे धबधबे यामुळे तालुक्यातील पर्यटन हे दिवसेंदिवस बहरत चालले आहे. दरम्यान मान्सूनला सुरुवात होत नाही तोच मुंबई, पुणे येथील पर्यटकांची पाऊले आज रविवार ७ जुलै कर्जत तालुक्यात वाहणाऱ्या धबधब्यावर दिसून आली. तालुक्यातील प्रसिद्ध भिवपुरी येथील अशाने-कोषाणे धबधब्यावर देखील पर्यटकांची गर्दी उसळली होती.तर जवळच्या काही धबधब्यावर पर्यटकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने जाणे पसंत केले होते. जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असणाऱ्या माथेरान येथील धबधब्यावर सर्वाधिक पर्यटकांची गर्दी दिसून आली.त्यामुळे येथील घाट रस्ता देखील काहीकाळ पर्यटकांच्या वाहनाने जाम झाला होता. सकाळपासून पर्यटक हे रेल्वे ने तर कही खाजगी वाहनाने मान्सूनचा आनंद घेण्यासाठी म्हणून माथेरानच्या दिशेने आले होते.गेल्या एक आठवड्यापासून माथेरान परिसरात पावसानं जोर धरल्याने आता येथील धबधब्यांना देखील मोठ्या प्रमाणात पाणी आले आहे.त्यामुळे पावसाळ्यात माथेरानला येणारे पर्यटकांची पावलं या फेसाळणाऱ्या धबधब्याकडे वळत आहेत. विशेषतः विकेंडच्या दिवशी या धबधब्यांवर मोठ्या प्रमाणात गर्दी असते.

सध्या पाऊसाने चांगलाच जोर धरला असून माथेरान मध्ये आता पावसाळी पर्यटन हंगाम सुरू झालाय, येथे डोंगरदाऱ्यांमध्ये ओसंडून वाहणारे पांढरे शुभ्र धबधबे इथला हिरवा गार निसर्ग आणि पावसाळी धुक्यात हरवलेली रस्त्याची वाट शोधत जाताना पर्यटक आनंद लुटत असून मौज मज्जा मस्ती करीत आहेत. कधी कधी कोसळणाऱ्या जोरदार पावसाने येणाऱ्या पर्यटकांची उडणारी त्रेधातिरपीट अश्या अनेक गोष्टींमुळे माथेरानचे पावसाळी पर्यटन खुलून गेलंय.

माथेरानमधील पावसाळी पर्यटन हंगामात पर्यटकांचे मुख्य आकर्षण म्हणजे येथील नेरळ ते माथेरान या रस्त्यावर लागणारा मोठा धबधबा पर्यटकांना आकर्षित करत असतो. या धबधब्यावर शेकडोच्या संख्येने पर्यटक इथं मनसोक्त आनंद लुटतात. यामध्ये महिला, पुरुष, लहान मुलांसह सगळेच येथे या वॉटरफॉलची मजा घेताना आज दिसत होते.

**अलिबाग नगरपरिषद**

मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, अलिबाग रायगड खाली नमूद केलेल्या कामांसाठी पुरवठादाराकडून प्रति नगचे दर मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळण्याचा दिनांक | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषदेतील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना पावसाळी रेनकोट पुरविणेबाबत | २०००/- | ९/०७/२०२४ ते १८/०७/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी २-०० पर्यंत | १९/०७/२०२४ वेळ सायं.४-०० वा. पर्यंत राहील | २००/- |

**सुचना :-** १) कामाबाबतची अधिक माहिती निविदा फॉर्म मध्ये देण्यांत आली असून नगरपालिका कार्यालयात आरोग्य विभागात संपर्क केल्यास उपलब्ध होईल.
२) राष्ट्रीयकृत बँकांकडील धनाकर्षाने इसारा रक्कम भरण्यात यावी.
३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

सही/-
**(अंगाई साळुंखे)**
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद.

## कृषी सप्ताहानिमित्त वृक्ष लागवड

**रसायनी :** पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व ग्रुप ग्रामपंचायत माजगाव व कोएसो माध्यमिक शाळा माजगाव यांचा संयुक्त विद्यमाने कृषी सप्ताहनिमित्ताने विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यात आंबा, वड, पिंपळ, फणस, जांभूळ, काजू आदी वृक्षांचे वृक्षारोपण शाळा परिसरात व पौध ते आंबिवली दोन किमी रस्त्यालगत करण्यात आले.

## पान १ वरून

### मुसळधार पावसाचे थैमान

अलिबाग तालुक्यातील नागाव, बुरूमखान, चौल, नेहुली, मुळे, बामणोली, राजमळा, महाजने, रामराज, भिलजी बोरघर, या गावांमधील काही घरांमध्ये पाणी शिरले. त्यामुळे घरातील अनेक वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले. मुरूड तालुक्यातील चिखणी येथील पुलाला भगदाड पडले आहे. दुपारी काही प्रमाणात पावसाने विश्रांती घेतली. पावसाचा जोर कमी झाल्याने पाण्याची पातळी कमी झाली होती. मात्र दुपारनंतर पावसाची रिपरिप सुरुच होती. परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र रात्री पाऊस सुरु राहिल्यास नागरिकांनी सतर्क राहवे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले.

#### पीएनपी नगर, बस स्थानक पाण्याखाली

अलिबाग शहरातील अनेक भागात पाणी साचले होते. शहरातील पीएनपी नगरसह अनेक भागात पाणी साचल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. एसटी बस स्थानकातदेखील पाणी साचल्याने प्रवाशांसह नागरिकांचे प्रचंड हाल झाले. पोलीस मुख्यालयाच्या परिसरात झाड उमळून कोसळले.नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन ते झाड काढून रस्ता वाहतुकीला मोकळा केला.

#### महाडमधील दोन कुटूंब स्थलांतरित

महाड तालुक्यातील बिरवाडीमधील भैरवनाथ नगर येथील अंतर्गत नाल्याची संरक्षक भिंत कोसळली.नाल्यालगत असणारे अभिजीत मोरे यांच्या मालकीची दुमजली आरसीसी इमारत धोकादायक स्थितीत असून इमारतीमधील दोन कुटूंबातील पाच व्यक्तींना नामदेव म्हामुणकर यांच्या घरी तात्पूरत्या स्वरुपात स्थलांतरीत केले आहे. महाड नवेनगर येथील महाड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या गोडावूनमधील एका बाजूची भिंत कोसळली आहे. भिंती शेजारी असणारी पिठाची चक्की भिंती खाली गेली आहे.

#### रामराज गावात पाणी

रात्रीपासून सुरु असलेल्या पावसाने धुमाकूळ घातला. रामराज नदीला पुर आला होता. त्यामुळे रामराजसह बोरघर येथील अनेक घरांमध्ये तीन ते चार फुट उंच पाणी शिरले. घरातील वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले. तसेच कुंठ्याची गोठीमधील काही घरांमध्ये पाणी शिरल्याने वित्तहानी झाली. याबाबत बामणगावचे ग्रामसेवक व तलाठ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून पंचनामे केले.

#### आगारदांडा-इंदापूर मार्गावर मातीचा ढिगारा

रात्रीपासून सुरु असलेल्या पावसामुळे मुरूड तालुक्यातील आगारदांडा-इंदापूर मार्गावर डोंगराचा मातीचा ढिगारा आला होता. त्यामुळे वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला होता. प्रशासनाने तातडीने मातीचा ढिगारा जेसीबी व अन्य साहित्यांच्या मदतीने तातडीने काढून रस्ता वाहतुकीला मोकळा केला.

#### अखेर तलाठी लागले कामाला

अलिबाग - पेण मार्गावरील राऊतवाडी जवळील एक झाड रस्त्यावरच कोसळले. या घटनेची माहिती महिला तलाठी शिर्के यांना मिळाली. त्यांनी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी धाव घेतली. एका बाजूला पडत असलेला पाऊस त्यात झाडांच्या फांद्या तोडण्यासाठी कामगार बोलविणार कसे असा प्रश्न त्यांना निर्माण झाला होता. अखेर त्यांनी हातात कोयता घेऊन झाडांच्या फांद्या तोडल्या. स्वतः पुढाकार घेऊन जनतेच्या हितासाठी त्यांनी झाडांच्या फांद्या तोडून एक बाजूचा रस्ता मोकळा केला. त्यानंतर जेसीबीच्या मदतीने झाड बाजूला घेऊन रस्ता पूर्णपणे वाहतुकीला सुरु केला.

### किल्ले रायगड ३१ जुलैपर्यंत बंद

३०० शिवभक्त पर्यटकांना पोलीस यंत्रणेद्वारे रोपवेच्या माध्यमातून सुरक्षित खाली उतरवण्यात आले आहे. सद्यस्थितीमध्ये किल्ले रायगडाच्या पायरी मार्गावर तसेच नाणे दरवाजा येथे पोलिसांनी बॅरिगेट्स लावून हा मार्ग शिवभक्त, पर्यटकांसाठी बंद केला आहे. नातोंडी येथील घरांचे अंशतः नुकसान व बिरवाडी भैरवनाथ नगर येथील दोन कुटुंबातील पाच व्यक्तींना स्थलांतरित करण्यात आल्याची माहिती महाड तहसील कार्यालयातून देण्यात आली आहे.

### मंत्र्यांनाच पावसाचा फटका

आमदार ट्रेनमध्ये होते. मुंबईतील अतिवृष्टीमुळे विधानसभा काम काजावर परिणाम झाला होता. बाहेरुन येणाऱ्या गाड्या मध्येच थांबल्याने मदत व पुर्नवसन मंत्री अनिल पाटील आणि आमदार अमोल मिटकरी यांची रेल्वे ट्रॅकवरुन पायपीट झाली. संजय बनसोडे हेही लातूर येथून येणाऱ्या ट्रेनमध्ये अकडले. महालक्ष्मी एक्स्प्रेसमध्ये मंत्री हसन मुश्रीफ अडकले. त्यामुळे विधिमंडळाचे कामकाज रद्द करावे, अशी मागणी अनेक आमदारांनी विधानसभा अध्यक्षांकडे केली होती.

### पहिल्याच पावसात युती सरकारचे पितळ उघडे

झालेला आहे पण अशी बिकट परिस्थिती झाली नव्हती. राजकारणापेक्षा मुंबईच्या कामात जास्त लक्ष घातले असते तर आजची परिस्थिती उद्भवली नसती. मुंबईत कोट्यवधी रुपयांचे सिमेंट रस्ते बांधले पण त्यात खड्डे आहेत. कोस्टल रोडच्या बोगद्याला गळती लागली, अटल सेतूला भेग्या पडल्या, हा महायुतीचा विकास आहे का? महापालिकेने मान्सूनपूर्व कामे केली. नालेसफाई केली, असा सरकारचा दावा आहे, तो या पावसाने खोटा ठरवला. मुख्यमंत्री ग्रीन कार्पेटवर उभे राहून नालेसफाईच्या पाहणीचे प्रदर्शन करत होते. त्यांच्या इव्हेंटबाजीचा पर्दाफाश झाला आहे. नालेसफाईत सुद्धा हातसफाई करुन खिसे भरण्याचेच काम झाले, म्हणून मुंबई तुंबली. एकाच पावसात विधिमंडळाचे अधिवेशन दिवसभरासाठी तहकूब करावे लागले, हे या सरकारचा गलथानपणा व निष्काळजीपणाचे उदाहरण आहे, असे नाना पटोले म्हणाले.

### सिंधुदुर्गात ४०० नागरिकांचे स्थलांतरण

मुसळधार पावसामुळे बांदा-दापोली या राज्य मार्गावर नदीचे पाणी आल्यामुळे रस्ता बंद झाला आहे. सकाळपासून ओसरत असतानाच सपतनाथ नजिक कॅनॉल पुलानजिक डोंगराचा बराच भाग रस्त्यावर कोसळल्याने रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. सध्या हा मार्ग बंद झाल्यामुळे वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अलिबाग- रोहा रस्ता खचला

आहे. त्यामुळे पहिल्याच पावसात हा रस्ता खचल्याने वाहतूकीवर त्याचा परिणाम होण्याची भिती निर्माण झाली आहे. या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत शंका निर्माण झाली आहे. रस्ता असाच खचल्यास या मार्गावरील वाहतूक बंद होण्याची चिंता प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

रुंदीकरणाच्या नावाखाली साईटपट्ट्यावर टाकलेली खडी बाहेर निघू लागली आहे. तसेच वेलवळी खानाव ते उसर पर्यंतचा तयार करण्यात आलेल्या काँक्रीट रस्ता अपूर्ण झाल्याने वाहतुकीवरही त्याचा परिणाम होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या गलथान कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केले जात आहे. रामराज नजीकच्या उमटे एस.टी. स्थानकासमोरील वळणावर नाल्याला आलेल्या पाण्याने रस्ता फुटून खचला आहे. लवकरच या रस्त्याची डागडुजी केली नाही तर अलिबाग-रोहा वाहतूक बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### चित्रलेखा पाटील मदतीला धावल्या

शिरल्याने घरातील तांदूळ, कपडे, फर्निचर व विद्युत उपकरणे भिजून गेले. त्यामुळे त्यांचे प्रचंड नुकसान झाले. गावाजवळ आलेल्या पुरामुळे किरण पाटील या शेतकऱ्यांच्या भात पेंढ्याचे प्रचंड नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी नेहुली येथे जाऊन नुकसानग्रस्तांची भेट घेतली. त्यांची विचारपूस करून त्यांना मदतीचा हात दिला. तात्काळ त्यांनी महसूल विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून योग्य पंचनामे करण्यात यावे, अशी मागणी केली. यावेळी सरपंच नासिकेत कावजी, माजी उपसरपंच विजय थळे, विनोद पाटील, नामदेव पाटील, संतोष पाटील, निवास घरत, बाळकृष्ण पाटील, पंढरीनाथ पाटील, किरण पाटील, श्रेयस पाटील, ॲड. अशिष बाने, अमोल नाईक आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ व महिला उपस्थित होते.

### युवराज पाटील यांनी घेतली नुकसानग्रस्तांची भेट

कोसळण्याची पाहणी युवराज पाटील यांनी केली. यावेळी विक्रांत वार्डे, माजी सरपंच मोहन धुमाळ, विश्वनाथ झावरे, किफायत पटेल, संतोष झावरे, महेंद्र भोईर, सुरेश पुनकर, धर्मा झावरे, प्रभाकर भगत, मधू धोंगडे, अनिल भोईर, प्रभाकर भगत, महेश झावरे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### एमपीएससी परीक्षेला अतिवृष्टीचा फटका

याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी, अशी माहिती एमपीएससीने स्पष्ट केले. काही दिवसांपूर्वी याच परीक्षेबाबत गोंधळ उडाला होता. महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३, मधील लिपिक टंकलेखक व कर सहाय्यक या संवर्गाची टंकलेखन कौशल्य चाचणी परीक्षेत पहिल्याच दिवशी तांत्रिक गोंधळ उडाल्याने १ ते ३ जुलैपर्यंतची परीक्षा रद्द करण्यात आली होती.

### चारधाममध्ये ६ हजार भाविक अडकले

रविवारी आलेल्या पुरात आणखी आठ जणांना जीव गमवावा लागला. त्यामुळे यंदाच्या पूर, भूस्खलन आणि वादळात मृतांची संख्या ७८ झाली आहे. काझीरंगा राष्ट्रीय उद्यानात १२८ प्राण्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. ऋषिकेश एआरटीओ मोहित कोठारी यांच्या म्हणण्यानुसार, पर्वतांमध्ये हवामान खूपच खराब आहे, त्यामुळे ६०० भाविक हरिद्वार आणि ऋषिकेशमध्ये अडकले आहेत, कारण राज्य सरकारने हरिद्वारच्या पलीकडे जाण्यास बंदी घातली आहे.

### शरद पवार गटाला मान्यता

देणगी स्वीकारता येणार आहे. निवडणूक आयोगाने तशी अधिकृत मान्यताच आज पक्षाला दिली आहे. त्यामुळे शरद पवार गटाला खूप मोठा दिलासा मिळाला आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आता कलम २९ ब नुसार देणगी स्वीकारता येणार आहे.

यापुढे शरद पवार यांच्या पक्षाला देणगी स्वीकारण्यासाठी अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. निवडणूक आयोगासमोर सोमवारी (दि.८) याबाबत सुनावणी पार पडली. या सुनावणीत शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्षाला देणगी स्वीकारण्यास मान्यता मिळाली आहे. शरद पवार गटासाठी हा मोठा दिलासा आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक आल्या तारिक अन्सारी, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे | ६३७/१/१ | ०-६५-५० | ९.४९ |
| | | ०-३३-५० | |
| | | ०-९९-०० | |
| | पो. ख. | ०-०३-३० | |
| | | १-०२-३० | |

तसेच सदर मिळकतीमध्ये असलेले ग्रामपंचायत धोकवडे घर नं. १००६ हे ४५०० चौरस फूट क्षेत्रफळाचे व रूपये २८०३०/- एवढी घरपट्टी असलेले घर यासह संपुर्ण मिळकत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अषिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अलि व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ९/७/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. मार्केवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहेः-

| मालकाचे नाव | सर्व्हे/ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| १) गीतिका राजीव अगरवाल<br>२) राजीव शिवशंकर अगरवाल | ३०/११ | ०-४७-०० | ४-४४ |
| १) राजीव शिवशंकर अगरवाल<br>२) गीतिका राजीव अगरवाल | २५/४ | इतर अधिकार मधील रस्ता वहिवाटीचे क्षेत्र १९२ फूट लांबीचे व १५ फूट रूंदीचे एकूण क्षेत्र २८८० चौ. फूट म्हणजेच ०-०२-८८ हे.आर. पॉ. | |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: ०९/०७/२०२४

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे ढाक, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मनोहर गिरीधर ठाकूर वगैरे ४ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे ढाक, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ६० | १ | ६-१५-००<br>पैकी मनोहर गिरीधर ठाकूर वगैरे ४ यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र २-८०-०० | ३-१२ |

तसेच मौजे ढाक, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक जया दिपक भावनानी व १ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे ढाक, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ६० | १ | ६-१५-००<br>पैकी जया दिपक भावनानी व १ यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र २-८०-०० | ३-१२ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०९/०७/२०२४
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत सिवील कोर्टसमोर, कर्जत, कर्जत, रायगड

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे रजपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक विजय वसंत कोळी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४ | ०-११-१० | ०-४१ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०९/०७/२०२४

**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता - ब्लॉक नं.१०१, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, पहिला मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मोबाईल नंबर ९६०४५४५७७७

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकती/बिनशेती मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे -नांगुर्ले, तालुका- कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती व बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ./ आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| नफीसा मोहमद मिलवाला वै.१२ | २२ | १५/ब | ४००० चौ.मी | ४००-०० |
| नफीसा मोहमद मिलवाला वै.१२ | २२ | १५/अ/१ | ०-८१-०० | ०-६३ |
| नफीसा मोहमद मिलवाला वै.१२ | २२ | ४ | ०-३३-०० | ०-१९ |
| नफीसा मोहमद मिलवाला वै.१२ | २२ | ७ | ०-८१-०० | ०-७२ |

सदरची जमीन मिळकती/बिनशेती मिळकत ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने असल्याने त्यांनी सदरील मिळकती ह्या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती/बिनशेती मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकार बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ९/०७/२०२४

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमुख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे जामरुंग ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमुद केलेली प्लॉट मिळकत ही महसुल रेकॉर्ड प्रमाणे ७/१२ उताऱ्यावरील खालील प्लॉट मालकांच्या नावावर असुन त्यांच्या मालकीच्या व कब्जेवहीवाटीच्या असून ती निर्वेध बोजा रहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस त्यांनी दिलेला आहे. आमचे अशिल चेतना मृणाल ब्रज आणि मृणाल ब्रज यांनी खालील वर्णन प्लॉट मालकांकडून नमूद क्रमांकाचे प्लॉट विकत घेण्याचे ठरवलेले आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे

| प्लॉट मालकांचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ आर.चौ.मी. क्षेत्र | आकारणी रु. पैसे |
|---|---|---|---|
| बाळू हिरु तवळे | १३०/४७ | ५.१५.०० | ५१.५० |
| विमल बालू तवळे | १३०/५१ | ३.८४.०० | ३८.४० |
| सागर बाळू तवळे | १३०/५२ | २.४७.०० | २४.७० |
| सायली बालू तवळे | | | |

वर नमुद मिळकतीच्या बाबतीत कोणतीही व्यक्ती यांचा इतर कसलाही हितसंबंध, अधिकार, ताबा, पोटगीहक्क, कब्जा, मालकी, वहीवाट, बयाणा, साठेकरार, विक्री, लीज, लीन, चार्ज, मृत्यूपत्र, बोजा, कर्ज, डिक्री, तारण, दान, बक्षिस, कुळवहीवाट, कुलमुखत्यार, खरेदी-विक्री भाडेपट्टा, दावा, मनाईहुकूम, वारसाहक्क, अथवा कोणताही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे कालावधी कालावधीमध्ये आपले कागदपत्रासहीत पुराव्याचे सोबत तसे खालील सही करणार वकील यांचे पत्त्यावर प्रत्यक्ष लेखी कळवावे.

वरील दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या लेखी हरकती आल्या नाहीत तर वरील नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व अधिकार नाहीत असे समजण्यात येईल व विद्यमान मालकांचे मालकी हक्क कायदेशिर, निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहेत असे गृहित धरून व समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या हरकतीस आमचे अशिलांवर अगर सदर जमिन मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी येणेप्रमाणे सदरची जाहीर नोटीस दिली असे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०९/०७/२०२४
सही/-
**ॲड. अजित वि. मंडलिक**
रा. ऑफीस नं. ०४, श्रीनाथ
अपा. श्रीराममंदीराजवळ, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१
मो. नं ९२२०८३८१८२

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- पी.एन.पी मध्ये गाळा भाड्याने देणे आहे. साबु हॉस्पिटल बिल्डींग, कलावती भाजी भंडारच्या बाजुला संपर्क - ९६०४१३८८२६/७३०४८५२३१५
- अलिबाग मधिल ऑफिस करिता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन,आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



● (छायाचित्र- सुधीर नाझरे)

# घरांवर कोसळली दरड; महिला जखमी

। उरण । वार्ताहर ।

पावसाचा जोर वाढल्याने केगाव ग्रामपंचायत हद्दीत पुर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यात कासवळे गावातील रहिवाशांच्या घरात पावसाबरोबर समुद्राचे खारे पाणी शिरल्याने रहिवाशांची धावपळ उडाली आहे. तर डाऊर नगर, गणेश नगर, शक्कर पीर दर्गा आणि आदिवासी वाडीवर रात्रीच्या सुमारास रहिवाशांच्या राहत्या घरावर दरड कोसळली. या घटनेत रहिवाशी महिला जखमी झाल्या असून त्यांना रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

गेले काही दिवस दडी मारलेल्या पावसाने रविवारपासून (दि.७) दमदार सुरुवात केली. त्यामुळे केगाव ग्रामपंचायत हद्दीत पुरपरिस्थिती निर्माण झाली. त्यातच तालुक्यातील अनेक गावांतील सखल भागात पाणी साचले होते. तर, काही रस्ते पाण्याखाली गेले होते. चाणजे ग्रुप ग्रामपंचायतीच्या नियोजनशुन्य कारभारामुळे कासवळे गावातील रहिवाशांच्या घरात तसेच विद्यमान ग्रामपंचायत सदस्य रवि कोळी यांच्या राहत्या घरात पावसाबरोबर समुद्राचे खारे पाणी शिरल्याची घटना घडली. यावेळी रहिवाशांची एकच धावपळ उडाली. तर, डाऊर नगर, गणेश नगर, शक्कर पीर दर्गा आणि आदिवासी वाडीवरील गणेश आगरकर, नवाज शेख आदी रहिवाशांच्या राहत्या घरावर रात्रीच्या सुमारास दरड कोसळण्याची घटना घडली. या घटनेत रहिवाशी महिला जखमी झाल्या असून त्यांना रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आल्या असून त्या सुखरूप आहेत.





> चाणजे ग्रामपंचायत हद्दीत दरवर्षी पावसाळ्यात दरड कोसळण्याच्या घटना घडत असताना द्रोणागिरी डोंगर भागात चाणजे ग्रुप ग्रामपंचायत घर बांधण्याची परवानगी देत असेल तर यापुढे या दुर्घटनेत जीवितहानी झाली तर याची सखोल चौकशी करून घर बांधण्याची परवानगी देणाऱ्या तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. तसेच, ज्या रहिवाशांच्या घराचे नुकसान झाले आहे त्या नुकसानग्रस्तांना शासनाने तातडीने नुकसान भरपाई द्यावी.
> –सचिन डाऊर, सामाजिक कार्यकर्ते, चाणजे

> पावसामुळे चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्या घटनेचे शासनस्तरावर पंचनामे सुरू केले आहेत. तरी, पावसाळा सुरू असल्याने रहिवाशांनी सावधगिरी बाळगावी आणि संबंधित प्रशासनाला सहकार्य करावे.
> – डॉ. उध्दव कदम, तहसीलदार, उरण

# मुरुड तालुक्याला पावसाचा तडाखा



। कोर्लई । वार्ताहर ।

रविवारी (दि.७) मध्यरात्री पासून मुसळधार पडणाऱ्या पावसाचा मुरुड तालुक्याला चांगलाच फटका बसला आहे. अतिवृष्टिमुळे साळाव-मुरुड रस्त्यावरील चिकणी पूल खचला असून अनेक ठिकाणी डोंगर भागातून रस्त्यावर माती वाहून आली आहे. तसेच, उसरोली-आदाड, खारदोडकुले या गावांत पाणी शिरले असून एकदरा गावातील मध्यरात्रीच्या सुमारास संरक्षण भिंत कोसळली आहे. तर, सावली गावानजीक रस्त्यावर दरड कोसळून काही काळ येथील वाहतूक ठप्प झाली होती.

तालुक्यात गेले दोन दिवस पावसाने दमदार हजेरी लावली असून रविवारी मध्यरात्रीपासून पडत असलेल्या जोरदार पावसाचा मुरुड तालुक्याला फटका बसला आहे. यावेळी तालुक्यात रविवार पासून २५५ मीमी इतक्या पावसाची नोंद झाली असून तालुक्यातील उसरोली हद्दीतील खारदोडकुले, खारिकावाडा, आदाड, वाळवटी व उसरोली या गावांना पुराच्या पाण्याचा मोठा फटका बसला आहे.

मध्यरात्रीपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे खारदोडकुले येथील ६० ते ६२ घरांमध्ये, शिघ्रे येथील ७० ते ७२ घरांमध्ये तसेच वाळवटी गंधील, चोरढे येथील घरांमध्ये पाणी भरल्याने घरातील वस्तूंचे नुकसान झाले आहे. तसेच, चिकणी येथील नाल्यामध्ये नंदकुमार दिवेकर यांची बैलगाडी वाहून गेली असून बोर्ली येथील रिक्षावर माडाचे झाड पडून रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे.



# मुरुड-चिकणी पुलाला भगदाड

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

रविवारी रात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे मुरुड तालुक्यातील काशिद येथील चिकणी गावाच्या मुख्य रस्त्यावरील पुलाला भगदाड पडल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे येथील ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाला माहिती मिळताच विभागाचे अधिकारी रमेश गोरे व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहचून परिस्थितीचा आढावा घेतला. भगदाड पडल्याच्या ठिकाणी धोक्याचे निशाण लावण्यात आले आहेत.



यावेळी रमेश गोरे कृषीवल प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले की, चिकणी पुलाचा एक भाग कोसळून भगदाड पडले आहे. सध्या मुसळधार पाऊस कोसळत असल्याने तातडीने काम करणं शक्य होणार नाही. पाऊस थांबला की लगेच कामाला सुरुवात करु. सध्या या ठिकाणी धोक्याचे निशाण लावले असून एक बाजुने रस्ता खुला केला आहे. तरी, मोठ्या वाहनांना या रस्त्यावरून वाहतूक करता येणार नाही, तसे पत्र मुरुड पोलिस ठाण्यात देणार आहोत. तसेच, वाहनचालकांनी या पुलावरून जाताना गाडीचा वेग कमीत कमी ठेऊन गाडी चालवावी, असे आवाहन ही सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता रमेश गोरे यांनी केले आहे.

# तुंगी गावाचा रस्ता धोकादायक

## पावसात साईडपट्ट्या गेल्या वाहून

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या तुंगी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे जून महिन्याच्या सुरुवातीला डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, मागील एक महिन्यातील जेमतेम झालेल्या पावसात या रस्त्याची साईडपट्टी वाहून गेली आहे. तर, रस्त्याच्या खाली दोन ठिकाणी मोठे भगदाड पडले असून रस्ता वाहतुकीस धोकादायक बनला आहे.

अंभेरपाडा ग्रामपंचायत मधील उंचावर वसलेल्या तुंगी या गावाला दोन वर्षांपूर्वी कच्चा रस्ता बनविण्यात आला होता. त्यावेळी रस्त्यावर खडीकरण करून स्थानिकांची येण्या-जाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, या रस्त्यावर डांबरीकरण झाले नव्हते. यासाठी स्थानिक आमदारांच्या निधीतून या रस्त्यावर मे महिन्यात खडीकरण करण्यात आले. यानंतर जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात डांबरीकरण करण्यात आले होते. जुन महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसात रस्त्याची साईडपट्टीच वाहून गेली होती. त्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभागाने संबंधित ठेकेदाराकडून रस्त्याची पुन्हा दुरुस्ती करून घेतली. मात्र, जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा या रस्त्यावरील अनेक साईडपट्ट्या वाहून गेल्या आहेत. तर, दोन ठिकाणी रस्त्याच्या खाली मोठे भगदाड पडले असून भाविषयात संपूर्ण रास्तच वाहून जाण्याची शक्यता असल्याचे स्थानिक लोक सांगत आहेत.



# जनजीवन विस्कळीत

। माणगाव । प्रतिनिधी ।

तालुक्यात गेल्या ४८ तासांपासून मुसळधार पावसाने थैमान घातले असून नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. माणगाव शहरातुन वाहणाऱ्या काळ नदीच्या पाण्याची पातळी वाढली असून नदी काठच्या लोकांना व जवळच्या गावांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. त्यातच शेतकऱ्यांची लावणीची कामे सुरु असल्याने बाजारपेठ ओस पडत असून दुकानदारांच्या व्यवसायावरही त्याचा परिणाम झाला आहे. मुसळधार पावसामुळे शहरातून वाहणाऱ्या काळनदीच्या पाण्याची पातळी हळू हळू वाढत असून शहरातील काही परिसराला पाण्याचा वेढा चोहोबाजूनी पडला आहे.

# तालुक्यातील मुशेत नदीला पूर

। सोगाव । वार्ताहर ।

हवामान खात्याने दिलेल्या मुसळधार पावसाच्या इशाऱ्यानुसार सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास आलेल्या पावसाने अलिबाग तालुक्यात दाणादाण उडवून दिली आहे. या पावसामुळे मध्यरात्री ३ च्या सुमारास मुशेत नदीला पूर येऊन नदीचे पाणी गावातील घरांत शिरले. यावेळी काही ग्रामस्थांचे संसारपयोगी वस्तू भिजून नुकसान झाले आहे. तर, मुशेत येथील एका शेतकऱ्याची म्हैस पुराच्या पाण्यात वाहून गेली आहे. तसेच, येथील प्रसिद्ध असलेल्या दर्ग्यात पुराचे पाणी जाऊन दर्ग्याचे मोठे नुकसान झालेले आहे.

सोमवारी सकाळी काहीसा पूर ओसरल्यानंतर रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष सुनिल थळे, माजी ग्रामपंचायत सदस्य अण्णा सातमकर, अनिल जाधव, सामाजिक कार्यकर्ते सज्जाद सय्यद, सचिन घाडी, सूचित थळे, अक्षय जाधव, ग्रामविकास अधिकारी माधुरी भोईर, तलाठी श्री. हांगे यांनी पूरपरिस्थितीची पाहणी केली व प्रशासन आपल्या सोबत असल्याचा दिलासा दिला.



मात्र, यावेळी संतप्त मुशेत ग्रामस्थांनी तलाठी यांना सांगितले की, गावाच्या परिसरात एका विकासकाने नाल्यावर बेकायदेशीर भराव करून नैसर्गिक पाण्याची वाट बंद केल्यामुळे व नदीवर अगदी गावाच्याजवळ ग्रामस्थांना विश्वासात न घेता बंधारा बांधल्यामुळे पुराचे पाणी गावात शिरल्याचा आरोप केला आहे. तसेच, लवकरात लवकर हा भराव काढून नाल्याची नैसर्गिकरित्या असलेली वाट मोकळी करावी, तसेच नदीवरील बांधलेला बंधारा त्वरित काढावा, अन्यथा यापुढे पुन्हा नदीला पूर येवून जीवितहानी व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तरी प्रशासनाने त्वरित पंचनामे करून आमचे नुकसान भरून द्यावे, असे तलाठी यांना सांगितले.











● रात्रभर पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील सिद्धेश्वर नदीला पूर आला. पुराचे पाणी नेहुली गावातील घरांमध्ये शिरल्यामुळे घरातील सामानाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील (चिऊताई) यांनी नेहूली गावात जाऊन नुकसानग्रस्तांची भेट घेतली. तसेच, रामराज येथे युवानेते युवराज पाटील यांनी स्थानीकांची भेट घेतली.



# पेट्रोल पंपाची संरक्षण भिंत कोसळली

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत - मुरबाड राष्ट्रीय महामार्गावरील कळंब गावाजवळ हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीचा पेट्रोल पंप आहे. सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे या पंपाच्या उभारणीत बांधण्यात आलेली संरक्षण भिंतच पडल्याची घटना घडली आहे. यामुळे पंपाच्या एका कोपऱ्यात उभी असलेली काही वाहने देखील थेट नाल्यात कोसळली आहेत.

कर्जत - मुरबाड महामार्गवर कळंब नाक्यापासून पुढे एक किलोमीटर अंतरावर हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीचा पेट्रोल पंप असून काही महिन्यांपूर्वीच सुरू करण्यात आला होता. पंपाचे काम करताना मागील बाजूस नाला असल्याने भराव टाकून संरक्षण भिंत बांधण्यात आली होती. मात्र, शनिवारी मध्यरात्री मुसळधार पाऊस झाल्याने पेट्रोल पंपाच्या मागील बाजूस भुस्सखलन होऊन संरक्षण भिंतीचा काही भाग कोसळून तेथे उभी असणारी वाहने बाजुला वाहत असलेल्या नाल्याच्या पाण्यात कोसळल्या. सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नसली तरी येथील कामगारांच्या वाहनांचे नुकसान झाले आहे. सुरक्षिततेच्या कारणाने हा पेट्रोल पंप काही वेळ बंद ठेवण्यात आला होता. या नुकसानीबद्दल महसूल मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी घटनास्थळी जात पंचनामा करून त्याच्या अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठवण्यात आला आहे.

# एकनाथरावांचा रमणा

टी-ट्वेंटी विश्वचषकामध्ये भारतीय संघाचा विजय झाला. त्याचा आनंद सर्व देशाला झाला. पण मुंबईकर आणि एकनाथ शिंदे यांच्या महाराष्ट्र सरकारला जरा तो जास्तच झालेला दिसतो. संघ बार्बाडोसहून परतला तेव्हा मुंबईत एक मिरवणूक काढण्यात आली. यापूर्वी २००७ मध्ये धोनीच्या संघाने पहिल्याच स्पर्धेतला विश्वचषक जिंकला होता तेव्हाचा आनंद समजण्यासारखा होता. तेव्हा वीस षटकांचा सामना ही कल्पना नवीन होती. शिवाय, तेंडुलकर, गांगुली वगैरे दिग्गजांना बाजूला सारून तरुणांचा संघ या स्पर्धेसाठी पाठवण्यात आला होता. पण त्यानंतर दरवर्षी आपण आयपीएलचा ऊरुस भरवतो. दोन-दोन महिने ऐन मे महिन्याच्या उन्हात पैशांसाठी जगभरचे खेळाडू खेळत राहतात. आता त्यातले नाविन्य संपले आहे. टी-ट्वेंटी ही एक कवायत झाली आहे. या पार्श्वभूमीवर, खरे तर भारताने २००७ पासून सातत्याने नाही तरी किमान दोन-तीनदा तरी ही स्पर्धा जिंकायला हवी होती. पण तसे झाले नाही. त्यासाठी थेट २०२४ उजाडावे लागले. यात या खेळाडूंचे कौतुक नक्कीच करायला हवे. तसे ते आपण करतोही. पण ते करताना आपण कोणतेही तारतम्य ठेवत नाही. क्रिकेट संघ एक विश्वचषक जिंकला तर त्याच्यावर बक्षिसांचा वर्षाव होतो. बीसीसीयने त्यांना १२५ कोटी रुपयांचे बक्षिस जाहीर केले आहे. ही रक्कम ऐकूनही दडपायला व्हावे. या खेळाडूंना एरवी भरपूर मानधन मिळत असतेच. शिवाय, जाहिराती, स्पॉन्सरशिप्स यामधूनही भरपूर पैसा मिळतो. आपल्या संघातले सर्वच जण विविध संघांमधून टीट्वेंटी खेळतात. त्या संघांकडून कोट्यवधींची खैरात त्यांच्यावर होत असते. अशा स्थितीत त्यांना पुन्हा १२५ कोटी रुपये देणे हा अतिरेक आहे. याच न्यायाने जेव्हा हे खेळाडू खराब कामगिरी करतात तेव्हा त्यांच्या मानधनातून पैसे कापले जायला हवेत. पण तसे होत नाही. भारतासारख्या गरीब देशात आणि इतर खेळांना दोन-चार लाख रुपये मिळतानाही मारामारी असताना क्रिकेट या एकाच खेळावर शेकडो कोटी रुपयांची ही उधळण अत्यंत गुन्हेगारी स्वरुपाची आहे.

## अंगणवाडी, एसटीवाले वाऱ्यावर

हा प्रकार कमी की काय म्हणून स्वतःला लोकप्रिय असे म्हणवून घेणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय संघाला अकरा कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. एरवी चारीठाव सुग्रास जेवणाऱ्याला भटजी म्हणून बोलावून वर पुन्हा दक्षिणा द्यावी तसला हा प्रकार आहे. पेशवाईच्या काळात पुण्यात भिक्षुकांवर अशाच रीतीने पैसे उधळले जात असत. या रमण्यात हात धुवून घेण्यासाठी मग प्रांतोप्रांतीचे लोक येत. पैसा जात होता तो लोकांकडून वसूल केलेल्या महसुलातला. नानासाहेब असो की दुसरा बाजीराव, त्यांना याची काहीच तोशीस नव्हती. एकनाथ शिंदे यांचे अकरा कोटींचे वाटप हा त्या रमण्याची आठवण करून देणारा प्रकार आहे. वास्तविक, हा काही एकट्या महाराष्ट्राचा संघ नाही. पूर्ण देशाचा आहे. तरीही खुद्द मोदी सरकारने देखील त्याला असे काही बक्षिस दिलेले नाही. बीसीसीआयने दिले आहे ते खूप झाले असे त्यांचे म्हणणे असावे. नाहीतरी, बीसीसीआयचे अध्यक्ष सध्या अमित शाह यांचे चिरंजीवच आहेत. त्यामुळे हा सर्व मोदी-शाह यांचा घरगुतीच मामला आहे. ते काही असो. पण महाराष्ट्र सरकारचे हे फुकटचे दक्षिणा-वाटप संतापजनक आहे. राज्यातील अंगणवाडी सेविका किंवा एसटीचे कर्मचारी इत्यादींना सरकारकडून आपले हक्काचे पैसे मिळवण्यासाठी अक्षरशः टाचा घासाव्या लागतात. प्रत्येक वेळी आंदोलने करावी लागतात. अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर दरवर्षी नवनव्या कामांचा बोजा वाढवत नेला जातो. मात्र त्यांना सेवेत घेण्याचा विषय झटकून टाकला जातो. त्यांना दिलेला फोन हाही सरकारच्या कामासाठीच आहे. या सेविक दुर्गम खेड्यापाड्यात हिंडतात. लसीकरण करतात. गर्भवती महिलांची काळजी घेतात. त्यांच्या सुयोग्य प्रसूतीसाठी धडपड करतात. त्यासाठी हा फोन गरजेचा असतो. पण कित्येक वर्षे त्यांना हा फोन देण्याची टाळाटाळ केली जात होती. दुसरीकडे पगार, महागाईभत्त्यासाठी एसटी कर्मचारी आजपासून पुन्हा आंदोलन करीत आहेत.

## पेशवाई बुडालीच

क्रिकेटपटूंचा सत्कार विधिमंडळात करण्यात आला. त्याचे प्रयोजन शिंदे यांनी जनतेला समजावून सांगायला हवे. अंगणवाडी वा एसटीसारखे कर्मचारी किंवा शेतकरी, विद्यार्थी वा अपंग इत्यादींच्या संघटनांनी आंदोलन करण्यासाठी मुंबईत येऊच नये असा बंदोबस्त सध्या सरकार करीत असते. सहा महिन्यांपूर्वी जरांगे-पाटलांना नवी मुंबईतून कसे परत पाठवण्यात आले ते सर्वांच्या लक्षात असेल. त्यातूनही समजा कोणी मुंबईत येण्याचा आग्रह धरलाच तर त्यांना आझाद मैदानाच्या एका कोपऱ्यात बसवण्यात येते. पूर्वी हे आंदोलक विधिमंडळाच्या वा मंत्रालयाच्या जवळ जाऊ शकत असत. त्यामुळे सर्व पक्षांचे आमदार व पत्रकार यांच्याशी संपर्क करणे सोपे होते. आता ते कोणाच्याही नजरेस देखील पडू नयेत अशी व्यवस्था केली गेली आहे. या पार्श्वभूमीवर क्रिकेटपटूंचा विधिमंडळात सत्कार म्हणजे त्यांच्या प्रसिध्दीच्या निमित्ताने आपणही चमकून घेण्याचा शिंदे सरकारचा घाणेरडा प्रयत्न आहे. राज्यातील कित्येक शाळांमध्ये टॉयलेट्स नाहीत. आरोग्य केंद्रांची स्थिती वाईट आहे. अनेक न्यायालयांची पडझड झालेली आहे. अशा स्थितीत राज्याचा मुख्यमंत्री आधीच अतिश्रीमंत असलेल्या खेळाडूंवर पैसे उधळतो हे संतापजनक आहे. याचा विरोधी पक्षांनी तीव्र विरोध करून अकरा कोटींची देणगी थांबवायला हवी. आपल्या क्रिकेटपटूंनाही हे पैसे घेताना यत्किंचित लाज वाटत नाही. गेल्या वर्षी बॅडमिंटनमधील विश्वचषक मानला जाणारा थॉमस कप भारतीय संघाने जिंकला होता. त्यावेळी महाराष्ट्र सरकारने आमचा साधा सत्कारही केला नव्हता अशी टीका आपल्या राज्याचा खेळाडू असलेल्या चिराग शेट्टीने केली आहे. पण शिंदे यांचा हिशेब साधा आहे. बॅडमिंटनच्या खेळाडूंचा सत्कार करून काय फायदा होणार? असल्या मतलबी हेतूने रमणे भरवणाऱ्या या सरकारला आता जनतेनेच धडा शिकवण्याची वेळ आलेली आहे. इतके पैसे उधळून पेशवाई शेवटी बुडालीच. दुसऱ्या बाजीरावाला परागंदा व्हावे लागले व नादान, चंगीभंगी अशीच त्याची इतिहासात नोंद झाली हे लक्षात ठेवलेले बरे.

विचार

# ...तर टळतील पावसाळी अपघात

**_पावसाळ्यामध्ये होर्डींग-डोंगर कोसळणे, पावसाच्या पाण्यात-पुरात माणसे, गाड्या वाहून जाणे किंवा पूल- भराव ढासळणे अशा घटना सातत्याने ऐकायला मिळत राहतात. सर्वसामान्यांच्या दृष्टीने हे दुर्दैवी प्रकार कमी होणे गरजेचे आहे. पावसाळ्यातली अपघातांची, आघातांची ही मालिका टाळायची असल्यास आपत्ती व्यवस्थापनाकडे बारकाईने लक्ष ठेवायला हवे. अनुभवातून शिकत काही नियम पाळले तर ही बाब अशक्य नाही._**



अरूण बापट

पावसाळा कितीही सुंदर आणि सर्जनशील असला तरी अलिकडे या काळात घडणारे अपघात एक नकारात्मक जाणीव निर्माण करुन जातात. वाढते शहरीकरण, चुकीचे नियोजन, नद्यांच्या माना मुरगाळून होणारी विकासकामे, बांधकामे न पाळले जाणारे निसर्गनियम अशा एक ना अनेक कारणांमुळे पावसाळ्यातील अपघातांची जंत्री वाढते. कधी भूस्खलन, कुठे दरडी कोसळणे, कुठे उघड्या गटारात पडल्याने होणारे अपघात, कुठे इमारती कोसळून झालेली जीवितहानी तर कुठे गावच्या गाव मातीखाली गाडले गेल्याच्या घटना या सुंदर ऋतूवर नकोसे बालंट आणतात. कॉंक्रिटच्या जंगलात पाणी भरल्यामुळे रहदारी खोळांबते तर पिकात पाणी शिरल्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती येऊ पाहणारा घास मध्येच खोळांबतो. एकंदरच अलिकडेच पावसापेक्षा पावसाने झालेल्या नुकसानीची अधिक चर्चा होते. पावसात कोण कसे अडकले, कोणता पूल पाण्याखाली गेले, कोणते होर्डिंग पडून त्याखाली किती जण अडकले, आलेल्या पुरात किती वाहने वाहून गेली हे वा यासारखे विषय चावून चोथा होईपर्यंत चघळले जातात. पण मुळात या सर्व अपघातांसाठी पाऊस नव्हे तर आपले अयोग्य नियोजन आणि निसर्गावर आक्रमण करण्याची चूक कारणीभूत आहे हे कोणालाच समजत नाही, वा समजत असले तरी ते समजून घेऊन योग्य ती सुधारणा करण्याची क्षमताच आता उरलेली नाही. त्यामुळेच आताच्या पाऊसकाळात तरी आधीच्या चुकांमधून काही शिकण्याची तयारी ठेवणे गरजेचे आहे.

अलिकडे पावसाचा पॅटर्न बदलला आहे. एकाच दिवशी ढगफुटीसारखा पाऊस पडत असल्याचे गेली काही वर्षे आपण अनुभवत आहोत. अर्थातच याचा मोठा फटका सहन करावाच लागतो. मुंबईत अतिवृष्टी झाल्यास शहरी भागात पाणी साठणे आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होणे ही मुख्य समस्या असते. किंबहुना, मुंबईत दर वर्षी पावसाळ्यात अशा घटना घडतातच. त्यांची चर्चा होते परंतु त्या संदर्भात योग्य असे पाऊल उचलले गेल्याचे दिसत नाही. टीव्ही चॅनल्सवरील चर्चांमध्येही आरोप-प्रत्यारोप अधिक असतात आणि अशा घटनांबाबत वैज्ञानिक चर्चा, त्यावरील उपाय याबाबत फारच कमी वेळा बोलले जाते. २६ जुलै ही तारीख कधीच विसरणे शक्य नाही. या दिवशी मुंबईत जवळपास एक हजार मिलिमीटर पाऊस पडला आणि त्यामुळे सर्वत्र हाहाकार उडाला. अशा वेळी आपत्ती व्यवस्थापनाचे काय, असाही प्रश्न विचारला गेला. योगायोगाने त्या दिवशी मीही मुंबईतील पावसात अडकून पडलो होतो. त्यावेळी महाराष्ट्र सरकारने अशा घटनांसंदर्भात आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने काही सूचना मागवल्या होत्या. त्यात मी एक सूचना केली होती. तथापि तिचा अंमलबजावणीच्या पातळीवर विचार करण्यात आला नाही.

अलीकडे मुंबईत जरासा पाऊस पडला तरी रस्त्यांवर पाणी साठते. याचे मुख्य कारण डांबरी रस्त्यांचे क्षेत्रफळ वाढणे हे आहे. मुंबईची सध्याची सांडपाणी वाहून नेणारी प्रक्रिया ७५ वर्षांपूर्वी बांधली आहे. एवढ्या वर्षात या प्रक्रियेचा विस्तार करण्याचे प्रयत्न झाल्याचे आढळत नाही. या पार्श्वभूमीवर मुंबईत अल्प पावसाने साठणाऱ्या पाण्यावर उपाय काय, असा प्रश्न विचारला जातो. सांडपाणी वाहून नेणारी मुंबईसारखी यंत्रणा जपानमधील टोकियो शहरात ५० वर्षांपूर्वी अस्तित्वात होती. परंतु त्यात बदल करण्याबाबत सखोल अभ्यास करण्यात आला आणि त्यातून काही उपाययोजना समोर आल्या. त्यात प्रामुख्याने टोकियोचे दोन बाय दोन किंवा तीन बाय तीन आकाराचे मार्ग तयार करण्यात आले. या मार्गांमधून पाणी समुद्रात जाण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यासाठी साधारणतः दीड ते दोन मीटर डायमीटरचे पाईप जमिनीखालून टाकून त्यातून पाणी समुद्रात सोडण्यात आले. या पाईपना असणारे व्हॉल्व एकाच वेळी आणि एकाच दिशेने उघडतील अशी व्यवस्था करण्यात आली. अशा या पाईपलाईनमधून पाणी समुद्रात जाते. परंतु समुद्राचे पाणी पाईपलाईनच्या वर येत नाही. अशा रितीने शहरातील सांडपाण्याचा जलद गतीने निपटारा होत राहिला. त्या तुलनेत मुंबईच्या सांडपाण्याची विल्हेवाट लावणाऱ्या यंत्रणेचा विचार करायचा तर हे पाणी पाईपलाईनमधून समुद्रात सात ते आठ मीटर खोलीवर सोडले जाते. भरतीच्या वेळी हेच पाणी शहराच्या सखल भागात येते. टोकियोतील व्यवस्थेमुळे तेथील शहरी सांडपाण्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न जवळजवळ सुटला आहे. तशाच पध्दतीने मुंबईच्या सांडपाण्याबाबत विचार होणे गरजेचे आहे.

पावसाळ्यात हमखास निर्माण होणारे आणखी एक संकट म्हणजे दरडी कोसळणे. यापूर्वी दरडी कोसळण्याचा प्रकार साधारणतः कोकण भागात होत असे. गेल्या काही वर्षात आपल्याकडे महामार्गांची तसेच अन्य काही मार्गांची निर्मिती करण्यात आली आहे. अशा कामांसाठी मोठमोठे खडक फोडावे लागतात. त्यामुळे खडकांमध्ये भेगा निर्माण होतात. पावसाचे पाणी या भेगांमध्ये गेल्यास ते आपल्या जागेवरून सरकतात. यालाच आपण दरडी कोसळणे असे म्हणतो. फोडलेला दगड हा सरळ ९० अंशात नसावा. त्यामुळे तो कोसळण्याची शक्यता वाढते. त्याऐवजी दगड १०० ते १०५ अंशात असल्यास दरड कोसळण्याची शक्यता कमी असते. रस्त्यालगतच्या दरडी कोसळू नयेत यासाठी जाळीचे पडदे लावण्यात येतात. यालाच शास्त्रीय भाषेत गॅबिऑन असे म्हणतात. या जाळ्यांमुळे दगड कोसळण्यास अटकाव होतो, त्यातूनही दगड कोसळल्यास ते जाळीला अडकतात. साहजिक ते वेगाने रस्त्यांवर येत नाहीत. त्यामुळे मोठी दुर्घटना टाळता येऊ शकते. समुद्र किनाऱ्यांलगत धूप थांबवण्यासाठी या जाळ्यांचा विशेष उपयोग केला जातो. कोकणच्या किनाऱ्यावर अशा प्रकारच्या गॅबिऑनचा उपयोग अधिक प्रमाणात केल्यास किनाऱ्याची धूप निश्चितपणे कमी होईल.

अलिकडे राज्यातील समुद्र किनाऱ्यावर चक्रीवादळ धडकले होते. शिवाय धुळीचे वादळही आले होते. अशा घटना घडत असतात. परंतु दुर्दैवाने कोणतीही घटना घडली तर त्यासाठी सरकारला जबाबदार धरले जाते आणि सरकारवर टीकेची झोड उठवली जाते. याला राजकीय कारण अधिक आणि वैज्ञानिक कारण कमी असते. याचे उदाहरण म्हणजे माळीणची दुर्घटना. माळीणमध्ये सरकारकडून पडकाई प्रकल्पाचे कार्य सुरू असून त्यामुळे ही दुर्घटना घडली असे म्हटले गेले. वास्तविक, माळीण, जुई वा अलिकडे पनवेलजवळील टेकडीवरच्या वस्तीत झालेली दुर्घटना गावाच्या वर उंचीवरील खडक घसरल्याने झाली. सरकारचे पडकाईचे काम सुरू असलेली जागा ही माळीण गावच्या खाली दहा ते १२ मीटरवर होती. त्यामुळे या कामाचा आणि माळीणच्या दुर्घटनेचा संबंध लावणे चुकीचे होते. परंतु तो लावून सरकारवर टीका करण्यात आली. हे वैज्ञानिक दृष्टीकोनातूनही अयोग्य आहे. दुसरीकडे आपत्ती व्यवस्थापनाबाबत सरकार योग्य ती काळजी घेत नाही हे ही तितकेच खरे आहे. मांढरदेवी यात्रेत झालेल्या दुर्घटनेत अनेक भाविकांना प्राण गमवावे लागले. त्यावेळी मंदिरात होणारी भाविकांची गर्दी आणि त्यावरील नियंत्रण तसेच त्या संदर्भातील उपाययोजनांबाबत बरेच बोलले वा लिहिले गेले. परंतु या घटनेपासून बोध घेत अन्य प्रमुख मंदिरांमध्ये मांढरदेवीसारखी दुर्घटना घडू नये म्हणून काही उपाय करण्यात आल्याचे दिसत नाही. विशेष म्हणजे मांढरदेवी मंदिर दुर्घटनेनंतर १४ जानेवारी २०११ रोजी केरळमधील शबरीमला मंदिरात झालेल्या भाविकांच्या चेंगराचेंगरीत १०२ जणांना प्राण गमवावे लागले. नैसर्गिक कारणांमुळे वा मानवी चुकांमुळे, दुर्लक्षांमुळे अनेक दुर्घटना घडत असतात. तथापि बऱ्याचदा प्रशासनातील शैथिल्यामुळे दुर्घटना घडल्याचेही आढळले आहे. या पार्श्वभूमीवर आता नाशिक येथे लवकरच कुंभमेळ्याला सुरूवात होत आहे. या सोहळ्यासाठी विविध संत-महंतांबरोबर लाखोंचा भक्तगण उपस्थित राहणार आहे. एवढ्या मोठ्या जनसमुदायाची व्यवस्था लावणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान असणार आहे. त्याचबरोबर या सिंहस्थाच्या काळात आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे उपाय योजले जाणे गरजेचे आहे. सिंहस्थाच्या पर्वकाळात गंगास्नानासाठी भविकांची मोठी झुंबड उडते. यावेळी चेंगराचेंगरी होण्याची आणि त्यातून काही दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्या दृष्टीने गर्दीवर नियंत्रण ठेवण्याबरोबर नदीपात्रात जीवरक्षक तसेच नौका तैनात करण्यासारख्या उपाययोजनांवर भर दिला जायला हवा. अशा प्रकारची सतर्कता बाळगल्यास दुर्घटना टाळणे किंवा त्यांची तीव्रता कमी करणे शक्य आहे. अलीकडे विविध प्रकारच्या दुर्घटनांची संख्या वाढत आहे त्या बरोबर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेवरील जबाबदाऱ्या वाढत आहेत. त्या दृष्टीने ही यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्याकडे सरकारला लक्ष द्यावे लागणार आहे.

आजकाल

# मरीन ड्राईव्हवरच्या क्रिकेटप्रेमींच्या गर्दीचा अर्थ...

हातरस येथे चेंगराचेंगरीत माणसे मेली तरीही जीवाची पर्वा न करता मरीन ड्राईव्हवर इतकी प्रचंड गर्दी जमली..देशात इतके प्रश्न असताना लोक क्रिकेटला इतके का महत्व देतात ? यावर खूप टीका झाली.. हे का घडते ? याचे विश्लेषण करण्याचा हा एक प्रयत्न.



हेरंब कुलकर्णी

या देशात आज मध्यमवर्गाची संख्या ३१ टक्के म्हणजे ४४ कोटी झाली आहे. त्यात ३० लाखापेक्षा जास्त उत्पन्न मिळवणारी संख्या ६ कोटीपेक्षा जास्त आहे. हा वर्ग हीच आज समस्या झाला आहे. पोर्शे गाडीने उडवणारा तरुण, अंबानींच्या लग्नापासून अयोध्येत प्रतिष्ठापना कार्यक्रमाचे निमंत्रण असलेला हाच वर्ग आहे.

हाच वर्ग आर्थिकदृष्ट्या स्थिरावल्यामुळे त्याला आयुष्य म्हणजे एक इव्हेंट करायचा आहे. आयुष्य त्यांच्यासाठी एक मनोरंजन आहे. हाच वर्ग प्रत्येक प्रश्नात मनोरंजन मूल्य शोधतो आहे.

बाजार कंपन्यांनी याच वर्गाला ग्राहक बनवणे समजू शकतो पण तिथपर्यंत हा वर्ग थांबत नाही तर या मनोरंजनाचे ओझे त्याने मीडियावर लादले आहे. त्यामुळे ग्राहक असलेल्या या वर्गाची मनोरंजन भूक पूर्ण करण्यासाठी या वर्गाचा मनोरंजन अजेंडा राबवते आहे...

या वर्गासाठी देशाचे आर्थिक, सामाजिक प्रश्न संपलेले आहेत कारण त्यांचे ते प्रश्न नाहीत. याचा परिणाम असा होतो आहे की प्रत्येक प्रश्नात फक्त मनोरंजन आता हवे आहे. निवडणुका या देशाचे गंभीर प्रश्न चर्चा होण्यासाठी साधन असतात पण या निवडणुका हे ही या वर्गाने मनोरंजन म्हणून वापरल्या. त्यांच्या अपेक्षा लक्षात घेवून माध्यमे ही देशाचे आर्थिक, सामाजिक प्रश्न यावर चर्चा न घडवता नेत्यांची वादग्रस्त वक्तव्य, एकमेकावरची चिखलफेक,नेत्यांना हिरो व्हीलन करणे,निवडणुकीतील नाट्यपूर्ण घटना दाखवतात..त्यात मनोरंजनाची उत्तेजना मिळते..

त्यातून देशाचे आर्थिक प्रश्न पुढेच येत नाही....

क्रिकेट हा तर मनोरंजन क्लायमॅक्स. तेव्हा हा रिकामटेकडा वर्ग त्यातून मोठ्या प्रमाणावर उत्तेजना घेतो. मीडिया या ग्राहकाला खुश करण्यासाठी आणि त्या वर जाहिरात साम्राज्य उभे करतो. सट्टेबाजी आणि इतर व्यवसाय फुलून येतात...त्यामुळे माध्यमांनी क्रिकेट जणू एखाद्या जागतिक महायुद्ध दाखवावे तसे दाखवले ...क्रिकेटयोद्धे शब्द वापरले जातात... जिंकणे हरणे म्हणजे जीवन मरण दाखवून त्यांनी हा उन्माद तयार केला...मरीन ड्राइव्हची गर्दी हा त्याचा दृश्य परिणाम आहे...

पण या गर्दीत तो ६ कोटी उच्च आर्थिक वर्ग येत नसतो...तो घरी बसून ही गंमत बघत असतो. तिथे सामान्य घरातील पोरे लोकलने जाऊन गर्दी करतात.. कारण माध्यमांनी त्यांना उत्तेजित केलेले असते.

माध्यमे या वर्गाचा अजेंडा थेट तळापर्यंत नेतात.. अगदी आदिवासी पाड्यावर ही आता त्यांचे पारंपरिक खेळ सोडून पोरे क्रिकेट खेळत असतात...सामान्य कुटुंबातील पोरे बायका ही काम सोडून क्रिकेट बघत राहतात ..या कुटुंबांना त्यांची रोजची दुःखे विसरायला असे आनंद अफू म्हणून काम करतात.

त्यामुळे हा उन्माद केवळ ४४ कोटी जनतेचा न होता दुपटीपेक्षा जास्त जनतेचा होतो.

पूर्वी राजकपूरचे चित्रपट गरीब सामान्य माणसे यांचे जग दाखवत पण आता चित्रपटातून गरिबी हटली आहे..थेट परदेशात शूटिंग होते आहे. करोडोंची गुंतवणूक करावी लागते. उच्च आर्थिक वर्गाचे मनोरंजन एवढंच उरले आहे.

या सर्वांचा परिणाम असा होतो की देशाचे खरे प्रश्न या मीडियाच्या बॉर्डरबाहेर जात आहेत...आणि नॉन इश्यू असलेले मुद्दे मात्र षटकार मारत आहेत. ही खरी वेदना आहे

**ताजा कलम : आणि मग या स्पर्धेत राजकारणी मागे राहत नाहीत.या बोलक्या वर्गाच्या दैवतांना ११ कोटीचा नैवेद्य दाखवतात.**

लोकसंसद

## आयोजकांकडून काटेकोर नियोजनाची हमी घ्यावी

हाथरस येथील चेंगराचेंगरीची घटना ताजी असतानाच पुरी येथील जगन्नाथ रथयात्रेदरम्यानही चेंगराचेंगरी होऊन एका भाविकाचा मृत्यु होऊन काहीजण जखमी झाल्याची बातमी वाचनात आली. मागच्याच आठवड्यात विश्वचषक विजेत्या भारतीय संघाच्या विजयी मिरवणूकीसाठी मरीन ड्राइव्हवर विशाल जनसागर लोटला होता. त्यावेळीही चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु मुंबई पोलिसांच्या चोख नियोजनामुळे भलते अरिष्ट ओढवले नाही. तरीही काही जणांना गुदमरल्यामुळे श्वसनाचा त्रास झालाच. जिथे जिथे प्रमाणापेक्षा जास्त गर्दी होते तिथे चेंगराचेंगरीची शक्यता जास्त असते. अशावेळी आयोजकांची जबाबदारी वाढते आणि त्यामुळेच गर्दी नियंत्रणासाठी काटेकोर नियोजन आवश्यक ठरते. त्यामुळेच अशा कार्यक्रमांना परवानगी देताना नियोजनाबाबतच्या अटीची पूर्तता होत असल्याची हमी आयोजकांकडून घेण्यात यावी आणि कार्यक्रमाला उपस्थितांच्या संख्येवरही मर्यादा घालण्यात यावी.

**- दीपक काशिराम गुंडये,** वरळी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**९ जुलै**

**१८७६ :-** अध्यात्मपर लेखक नागेश वासुदेव गुणाजी यांचा जन्म. 'स्वामी रामतीर्थ', 'राम. कृष्ण परमहंस आणि रमण महर्षी यांच्या चरित्रासह सायंटिफिक अॅण्ड एफिशियन्ट ब्रादिंग आणि अँटी टी. बी. अँड हार्टफेल एक्सरसायंझिस असे इंग्रजी ग्रंथ आणि पुष्कळ अनुवादीत साहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९२१:-** प्रभावी वक्ते, लेखक, समाजसेवक रामचंद्र काशिनाथ तथा रामभाऊ म्हाळगी यांचा जन्म. वेगवेगळ्या विषयांवर त्यांची ३५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९२७:-** अर्थशास्त्रावरील पाठ्यपुस्तकांसाठी ख्यातनाम असलेले लेखक प्रा.रामकृष्ण काशिनाथ बर्वे यांचा जन्म. 'अर्थशास्त्राची तोंडओळख', 'भारताच्या आर्थिक समस्या', 'वाणिज्य अर्थशास्त्र' तसेच 'सुरांनी पाझरला पाषाण', 'होमफंड', 'रसमुक्त' इत्यादी कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. **१९३४:-** लेखक पन्नालाल प्रेमराज खुराणा यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत 'गांधीजींची ओळख','डॉ. लोहियांचे विचार', 'बुलंद आवाज बाईचा', 'कारगील आणि भारताची संरक्षण सिध्दता', 'महाराष्ट्रातील पाणी प्रश्न', 'लोकशाही समाजवाद', 'धर्म आणि धर्म निरपेक्षता' मिळून वीसेक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३६:-** साहित्यिक सी. प. वालावलकर यांचा जन्म. ह्यांचा 'भातुकली', 'परका', 'लीला माझ्या साईबाबांच्या' मिळून १६ कादंबऱ्या, मुखवटा', 'अनुपमा', 'एक सूडाचा प्रवास' मिळून १० कथासंग्रह, 'द्राक्षवेल' हा काव्यसंग्रह, 'मोरपीस' हा चारोळी संग्रह, याशिवाय 'फिरक्या', 'अभंग' हे बालगीत, बालकथा अशी विपूल साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **१९४१:-** अर्थशास्त्रावर लेखन करणारे प्रा. जीवराज लुमचंद गांधी यांचा जन्म. यांचा 'किंमती' हा अर्थशास्त्रविषयक लेख आणि 'सम ाजवाद आणि भांडवलशाही' हा ग्रंथ अशी साहित्य संपदा. **१९४८:-** लेखक, पत्रकार, संपादक सुभाष दिनकरराव चांदूरकर यांचा जन्म. 'ढगाळलेला सूर्य' ह्या बालनाटिकेसह 'आधार','झाली फुले कळ्यांची' आदी नाटके प्रसिध्द. याशिवाय ३० स्मरणिकांचे संपादन त्यांनी केली आहे. तसेच ३०० लेख, १०० मुलाखती आणि ५००० अग्रलेख त्यांचे प्रकाशित झाले आहेत. **१९५६:-**लेखक, कवी ज्ञानेश्वर नागदेवते यांचा जन्म. 'भीमबद्ध संकल्पगीते', 'राष्ट्रीय प्रेरणागीते' ही त्यांची ग्रंथसंपदा. **१९६७:-** तत्वचिंतक, विचारवंत आणि 'अप्रबुध्द' या नावाने लेखन करणाऱ्या विष्णू केशव पाळेकर यांचे निधन. अण्णासाहेब पटवर्धनांचे त्यांनी लिहिलेले चरित्र गाजले. **१९६८ :** प्रवचनकार ९ जुलै १९६८ रोजी वैकुंठात विलीन झाले. संत साहित्याचे गाढे अभ्यासक, एस.पी. कॉलेजचे प्राचार्य, प्रसाद मासिकाचे संपादक शंकर वामन तथा सोनोपंत दांडेकर यांचा जन्म २० एप्रिल १८९६ रोजी झाला. बी.ए. झाल्यावर मुंबई विद्यापीठाची तत्त्वज्ञान विषयाची, 'प्रल्हाद सीताराम' ही शिष्यवृत्ती मिळवून पुढे ह.भ.प. जोग महाराज यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांच्या प्रेरणेने वारकरी संप्रदायात प्रवेश केला. त्याचबरोबर प्राध्यापकी करून अखेरीस एस.पी. महाविद्यालयातून प्राचार्य निवृत्त झाले. पुढे प्रसाद मासिकाच्या संपादकांची जबाबदारी स्वीकारून त्यात नियमितपणे लेखन केले. कीर्तन-प्रवचनकार म्हणून जनसामान्यांमध्ये परिचित असणाऱ्या सोनोपंताचे लेखन मुख्यतः प्राचीन संतांसंबंधी आहे. प्रसाद मासिकात त्यांनी केलेल्या लेखनाचे १६ प्रकरणांच्या लेखमालेचे संकलन करुन 'अध्यात्म शास्त्राची मूलतत्त्वे' हा ग्रंथ साकारला गेला. सोनोपंत दांडेकरांनी वारकरी पंथाचा इतिहास, श्री ज्ञानदेव चरित्र, ग्रंथ तत्त्वज्ञान आणि ईश्वरविषयक प्रश्नांची चर्चा करणारा 'ईश्वर वाद' हा ग्रंथ संपादला. याशिवाय ज्ञानदेव व प्लेटो हा तुलनात्मक ग्रंथ तर विष्णुबुवा जोग म हाराजांचे चरित्रही त्यांनी लिहिले. त्यांच्या संपादित साहित्यात श्री तुकाराम महाराज यांची गाथा व सार्थ ज्ञानेश्वरीचा समावेश आहे. तसेच त्यांनी भागवत धर्म, श्री ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज आदींवर माहिती देणाऱ्या पुस्तकाचेही त्यांनी संपादन केले. महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या ज्ञानेश्वरी व नामदेव गाथा या प्रकाशनाच्या समित्यांचे ते अध्यक्ष होते. पंढरीची वारी नित्यनेमाने करणाऱ्या या थोर कीर्तन, त्यांचा अंत्यसंस्कार आळंदीत करण्यात आला. त्यावेळेस पुणे ते आळंदीपर्यंत १४ मैलांचे अंतर चालत जाऊन ही अंत्ययात्रा पोहोचली. पुण्याच्या इतिहासात एवढ्या प्रचंड आणि दूरवर जाणारी ही पहिलीच अंत्ययात्रा. **२०१४:-** 'आपलं बुवा असं आहे','घेतलं शिंगावर','माया बिऱ्हाडी मी वऱ्हाडी' अशा गाजलेल्या नाटकांचे लेखक ज्येष्ठ नाटककार मनोहर काटधरे यांचे निधन. दुरदर्शनवरुन काही वर्षापूर्वी सादर झालेल्या पहिल्या बाजीरावावरील 'राऊ' या मालिकेचे लेखन काटधरे यांनीच केले होते. 'घेतलं शिंगावर' पासून सुरु झालेल्या कौटुंबिक विनोदी नाटकांचे दालन त्यांनी समृध्द केले. त्यांच्या दहा-बारा नाटकांचे हजारो प्रयोग झाले. 'बीबी करी सलाम','भानगडीशिवाय घर नाही','चाफा बोलेना','काठोकाठ भरु दे प्याला' ही त्यांची काही गाजलेली नाटके. खळखळून हसविणारा विनोद हे त्यांचे नाट्ययलेखनाचे वैशिष्ट्य होते. **२०१५:-** संस्कृतचे चालते बोलते विद्यापीठ, वेदांत पारितोषिकांचे मानकरी, लेखक डॉ. श्रीराम भातखंडे यांचे निधन. 'गीता', 'गायत्री', 'गोविंद' हे त्यांचे विषय. 'विवमोहिनी गीता' हे गीतेवर त्यांनी लिहिलेले पुस्तक. याशिवाय 'ब्रह्मविषय' पुस्तक सहज लिहिणारे भातखंडे प्रेमकविताही करायचे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# रायगड जिल्हा परिषदेच्या ८ शाळा नादुरुस्त

## ९ शाळांमधील १८ वर्गखोल्या धोकादायक

**। पनवेल । वार्ताहर ।**

**येथील जिल्हा परिषदेच्या आठ शाळा नादुरुस्त झाल्या आहेत. अडीवली, रोहिंजण, वडघर, वडघर आदिवासी वाडी, दिघाटी, बौध्दवाडी, पापडीचा पाडा, केळवणे येथील आठ शाळा नादुरुस्त आहेत. त्यांच्या दुरुस्तीसाठी ५२ लाख ६५ हजार ६७ रुपयांचा प्रस्ताव रायगड जिल्हा परिषदेकडून राज्य शासनाकडे पाठवण्यात आला आहे. तर धोकादायक नऊ शाळा असून वर्ग खोल्यांची संख्या १८ आहे.**

धोकादायक शाळांमध्ये कामोठे, कन्या शाळा गव्हाण, चिखले, कोळखेपेठ, लोणीवली, दुंदरे, वाकडी, तळोदा पाचनंद उर्दू, सवणे या नऊ शाळांमध्ये १८ वर्ग खोल्या धोकादायक आहेत. यापैकी कामोठे येथील वर्ग खोल्या वापरात नाहीत. कन्या शाळा गव्हाण येथील वर्गखोली पाडण्यात आलेली आहे. चिखले येथील एक खोली वापरात नाही. कोळखेपेठ येथील खोलीचा जागेचा वाद सुरू आहे. लोणीवली येथील दोन खोल्या वापरत नाहीत. दुंदरे येथे या खोल्यांमध्ये अंगणवाडी बांधण्याचा प्रस्ताव करण्यात आला आहे. वाकडी येथील खोली वापरात नाही. तळोजा पाचनंद उर्दू येथील तीन खोल्या वापरात नाहीत आणि सवणे येथील एक खोली वापरात नाही. यातील धोकादायक आणि नादुरुस्त असलेल्या काही शाळा महापालिका हद्दीतील देखील आहेत. धोकादायक वर्ग खोल्या पाडण्यासाठीचा प्रस्ताव अलिबाग येथे पाठवण्यात आले असल्याची माहिती शिक्षण विभाग, पनवेल पंचायत समितीकडून देण्यात आली. नुकत्याच शाळा सुरू झालेल्या आहेत. पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. काही ठिकाणी शाळा सुस्थितीत आहेत, तर काही गळक्या शाळा आहेत. काही शाळांवर छप्पर टाकण्यात आले आहे. त्यामुळे नादुरुस्त झालेल्या शाळांसाठीचा निधी लवकर मंजूर होणे गरजेचे आहे. निधी मंजूर झाल्यास शाळा दुरुस्ती करणे सोप होणार आहे.

> **नादुरुस्त शाळांसाठी जिल्हा नियोजनमधून मंजुरी प्राप्त आहे. तसेच युडायस प्रणालीमार्फत शासनाकडे तरतुदीची मागणी केलेली आहे. धोकादायक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसवले जात नाही. इतरत्र त्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच या धोकादायक शाळा पाडण्याची प्रक्रिया सुरू आहे.**
> **–अभिजीत मटकर, कनिष्ठ अभियंता**



## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ जुलै

१) श्री.दत्तात्रेय रघुनाथ भोसले
०९-०७-१९४४, अलिबाग
२) श्रीम.लक्ष्मी दिनेश वर्मा,
०९-०७-१९५३, चेंढरे, अलिबाग

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## रहिवासी हितवर्धक संघाने केले वृक्षारोपण




**। पनवेल । वार्ताहर ।**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघातर्फे पनवेल शहरात वृक्षारोपण २०२४ चा उपक्रम नमन बॅटरी ते अमरधाम हायवे सर्व्हिस रोड, पनवेल येथे बकुळ, ताम्हाण, कांचन आपटा, गुलमोहर, कादंब, अर्जुन, सोनचाफा, सातवीण, बदाम अशी देशी पर्यावरण पूरक झाडे लावून संपन्न झाला.

सदर उपक्रमास माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्याहस्ते प्रथम झाड लावून सुरवात झाली. मंडळाचे कार्यकारणी सदस्य, कार्यकर्ते, देणगीदार तसेच पर्यवरणप्रेमी हितचिंतक यांनी प्रतिसाद देऊन १५० वृक्षांची लागवड केली. सदर वृक्षांची देखभाल सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ करणार आहे. मंडळाचे अध्यक्ष केशव राणे, उपाध्यक्ष प्रिया खोबरेकर, सचिव राम चंद्र मोचेमाडकर, खजिनदार दीपक तावडे, सहखजिनदार बाबाजी नेरूरकर आणि सदस्य, युवा कार्यकर्ते यांनी परिश्रम घेऊन ही झाडे लावली. मंडळाच्या सदर उपक्रमंचे पनवेल परिसरात कौतुक होत आहे. आत्तापर्यंत मंडळातर्फे ४५० झाडे लावून मंडळाने निसर्ग संवर्धन कार्य उत्तमरित्या पार पडले आहे. कार्यकारणी, सदस्य परिवार, देणगीदार आणि सहभागी बालक मंडळी यांचे आयोजकांनी सर्वांचे आभार मानले.

## पनवेलमध्ये मृतदेह आढळला

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील महानगरपालिकेच्या आई जरीमरी खुले सभामंडपात एका इसमाचा मृतदेह आढळून आला. त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे, उंची ५ फुट ६ इंच, चेहरा गोल, बांधा मध्यम, डोक्यावरील केस काळे पांढरे, दाढी काळी-पांढरी, अंगात पांढऱ्या रंगाचे चौकोनी ठिपके असलेला फुल बाह्याचा शर्ट व नेव्ही ब्ल्यू रंगाची फुल पॅन्ट आहे. उजव्या हातात काळ्या रंगाचा धागा आहे. तसेच उजव्या हाताच्या मनगटावर हनुमानाचे चित्र गोंदलेले आहे. अधिक माहिती कळल्यास पोलीसांशी संपर्क साधावा.

## रिलायन्स एनएमडी एम्प्लॉईज सोसायटी निवडणुक

**। पाली /बेणसे । वार्ताहर।**

रिलायन्स एनएमडी एम्प्लॉईज को.आप.क्रेडीट सोसायटी संचालक मंडळाच्या निवडणुकीत विजयी उमेदवारांनी नागोठणे टाऊन शिप वसाहत आणि बेणसे येथे जल्लोष केला.

या विजयानंतर सर्व विजयी उमेदवारांचे कामगार वर्गातून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. सोसायटी संचालक मंडळाच्या निवडणुकीत विजयी उमेदवारांमध्ये के. टी शिर्के, गणपत पाटील, वैभव जवके, राजेंद्र कुमार दलाल, दत्तात्रय शेळके, अशोक भोय, राजा लवटे आदींचा समावेश आहे. कामगार वर्गाच्या हितासाठी, न्याय हक्कासाठी कायम कार्यरत असणाऱ्या विजयी उमेदवारांनी यापुढेही कामगारांचे हित जोपासण्याची भूमिका बजावावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. सर्व विजयी उमेदवारांचे कामगार नेते साधुराम मालुसरे, कामगार नेते दीपक रानवडे, कामगार नेते चवरकर, उदय दिवेकर, संजय काकडे आदींसह अधिकारी वर्ग व कामगारांनी अभिनंदन केले. यावेळी कामगार एक जुटीचा विजय असो अशा गगनभेदी घोषणा देण्यात आल्या.

### विजयी उमेदवारांचा बेणसेत जल्लोष

दरम्यान, कामगार नेते अशोक भोय यांच्या बेणसे येथील निवासस्थानी भेट घेऊन विजयी उमेदवारांनी अशोक भोय यांना वाढदिवसाच्या व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## क्रूरतापूर्वक वागणूक दिल्याप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** मोडक्या शेडमध्ये आठ गोवंशीय बैल आणि गाय यांना क्रूरतापूर्वक वागणूक दिल्या बाबत, तसेच त्यांना कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्या प्रकरणी सलमान हमीद पटेल (वय ३६ राहणार, तळोजा गाव) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळोजा गावामध्ये पनवेल मुंब्रा रोड लगत असलेल्या मशिदीच्या समोरील मोडक्या शेडमध्ये आठ गोवंशीय बैल आणि गाई कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवले असल्याची माहिती वॉलेंटियर ध्यान फाऊंडेशनचे प्रतीक ननावरे यांना मिळाली. त्याची माहिती पोलिसांना देण्यात आली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## लेखिका प्रज्ञा पोवळे यांचा सत्कार

**नागोठणे :** खासदार संसदरत्न डॉक्टर अमोल कोल्हे यांनी देशाच्या संसदेत केलेल्या हिंदी आणि इंग्रजी भाषणांचा अनुवाद व लेखन नागोठण्याची कन्या आणि एबीपी माझा या प्रतिथयश वृत्तवाहिनीची डेप्युटी प्रोड्युसर व वृत्त निवेदिका असलेल्या प्रज्ञा राजेश पोवळे यांनी केले आहे.

खासदार कोल्हे यांच्या भाषणावरील शिवनेरीचा छावा हे पुस्तक प्रज्ञा पोवळे यांनी लिहिले आहे. अत्यंत प्रख्यात असलेल्या सकाळ प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पुण्यातील टिळक स्मारक मंदिर सभागृहात नुकताच संपन्न झाला. ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत कुमार केतकर यांच्या हस्ते प्रज्ञा पोवळे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे, निर्भय बनो आंदोलनचे ॲड. असीम सरोदे, सकाळ प्रकाशनचे कार्यकारी संपादक सम्राट फडणीस उपस्थित होते.

## वनवासी कल्याण आश्रमातर्फे शालेय साहित्याचे वाटप

**। उरण । वार्ताहर।**

वनवासी कल्याण आश्रम उरण तालुक्याच्यावतीने रविवारी ७ जुलै रोजी अक्कादेवी आदिवासी वाडी चिरनेर, उरण येथे वाडी वरील विद्यार्थांसाठी मोफत वह्यावाटप, शालोपयोगी वस्तू वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

आदिवासी वाडीवरील विद्यार्थ्यांच्या मागे वनवासी कल्याण आश्रम सदैव पाठीशी उभी आहे, फक्त तुम्ही चांगला अभ्यास करा, काही अडचणी असतील, तर आमच्या वाडीवरील कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आणा, आम्ही सारे मिळून त्या सोडवण्याचा प्रयत्न करू, असे उरण तालुका सह सचिव कुणाल सिसोदिया यांनी सांगितले. आश्रमाच्या वसतिगृहात राहून ही आपल्याला शिकता येईल असेही ते म्हणाले. वाडीवरील ३५ मुलांना वह्यांचे वाटप करण्यात आले. ५० भगिनींना साड्या वाटण्यात आल्या. वह्या उरण मधील दानशूर व्यक्तीमत्व जितेंद्र परमार यांच्या वतीने देण्यात आल्या. उरण केगावमधील सामाजिक कार्यकर्त्या वर्षा अधिकारी आणि जितेंद्र जैन यांच्यावतीने उपस्थितांना साडी, कपडे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी चिरनेर ग्रामपंचायत सदस्य दीपक कातकरी, वनवासी कल्याण आश्रम जिल्हा हितरक्षा प्रमुख मीराताई पाटील आणि संजय दाते आदी मान्यवर उपस्थित होते.



## महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**। पनवेल । वार्ताहर ।**

ज्येष्ठ नागरिकांच्या घरी केवायसी अपडेट करण्यासाठी गेलेल्या २५ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी प्रदीप सदावर्ते (वय ७०, राहणार खारघर, सेक्टर ६) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ वर्षीय महिला बँकेत नोकरी करत असून त्या प्रदीप सदावर्ते यांच्या घरी केवायसी अपडेट करण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी त्यांनी महिलेला हाताला धरून खुर्चीत बसवले आणि पाठीवरून हात फिरवला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## विद्यालयास ७० पुस्तके भेट

**। पनवेल । वार्ताहर ।**

आदर्श शिक्षक कै गजानन गणू खारपाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, त्यांचे कनिष्ठ पुत्र, महामुंबई चॅनेलचे संपादक, जेष्ठ पत्रकार मिलिंद खारपाटील यांनी सोमवारी ८ जुलै रोजी रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर विद्यालयास ७० पुस्तके भेट दिली.



आतापर्यंत त्यांनी सेकंडरी स्कूल चिरनेर के. गो. लिमये वाचनालय पनवेल, न्यू इंग्लिश स्कूल पनवेल, वासुदेव बळवंत फडके हायस्कूल पनवेल, साने गुरुजी वाचनालय नेरे, शांतीवन रयत शिक्षण संस्थेचे वावरले हायस्कूल तालुका वाचनालय पोलादपूर, गजानन महाराज वाचनालय गिम्हवणे दापोली, साने गुरुजी वाचनालय भापट , म्हसळा सार्वजनिक माध्यमिक विद्यालय रावे, पेण मातोश्री विद्यामंदिर देवनार, मुंबई केशवराव खांबेटे वाचनालय म्हसळा, लोकमान्य टिळक वाचनालय चौक, तु. ह. वाजेकर विद्यालय फुंडे यासह इतरही काही वाचनालयांना आत्तापर्यंत पाच लाख रुपये किंमतीची पुस्तके भेट दिली आहेत. रायगड जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले आहे. कै गजानन खारपाटील गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना वाचाल तर वाचाल हा संदेश दिला होता.

## नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**। माणगाव । वार्ताहर ।**

येथील शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी १० जुलै २०२४ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत एचडीएफसी बँकेच्या समोर, मुंबई-गोवा महामार्गालगत पेपर विक्रेते नितीन मेथा यांच्या जवळील महेंद्र मेथा यांचा सभागृह जुने एसटी स्टँड माणगाव या ठिकाणी करण्यात आले आहे. तरी सदर शिबिराचा लाभ समाजातील सर्व गरीब गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.

या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी. तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरु असल्यास ती देखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे.

शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्ररुग्णांनी नाव नोंदणीकरिता विधिता मनीष मेथा मो. नं. ८६९८७४०६४०, सुप्रिया संतोष शिंदे मो. नं. ९०४९६६५५९८ यांच्याशी संपर्क साधावा.

## एकविरा मंदिर कार्ला येथे वृक्षारोपण

**उरण :** तालुक्यातील कोप्रोली येथील सामाजिक कार्यकर्ते देविचंद अनंत म्हात्रे यांच्या संकल्पनेतुन एकविरा प्रेमी ग्रुप कोप्रोली उरणतर्फे दरवर्षी उरण ते कार्ला (एकविरा देवी मंदिर) अशी बाईक रॅली काढली जात. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत दरवर्षी श्री एकविरा आई मंदिर कार्ला येथे डोंगर परिसरात वृक्षारोपण केले जाते. यंदा हे रॅलीचे ३ रे वर्ष असून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कार्ला येथे वृक्षारोपण करण्यात आले. उरण कोप्रोली ते आई एकविरा मंदिर कार्ला अशी बाईक रॅली काढण्यात आली. ४०० हुन अधिक भक्त यात सहभागी झाले होते.सर्वांनी एकत्र येत एकविरा देवी मंदिर परीसरात वृक्षारोपण केले.

## जेएनपीएकडून विहंग कडू याचा सत्कार

**। उरण । वार्ताहर ।**

जेएनपीए व कामगार एकता संघटनेचे अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या हस्ते जेएनपीए क्लब हाऊस येथे विहंग घन:श्याम कडू याने दहावी परीक्षेत ९४.२०% गुण मिळविल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



यावेळी ट्रस्टी दिनेश पाटील यांनी सांगितले की, इतरांना वारेमाप प्रसिद्धी देणारे पत्रकार अथवा त्यांचे कुटुंब मात्र स्वतः च्या कुटूंबातील मुलांना प्रसिद्धी देऊ शकत नाहीत. यासाठी जेएनपीए चेअरमन यांच्या माध्यमातून पत्रकारांच्या मुलांनी अनेक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेले आहे. त्यांचाही लवकरच गुणगौरव सोहळा करण्याचा मानस यावेळी त्यांनी व्यक्त केला.

पत्रकाराच्या मुलाने ९४ % गुण मिळविल्याबद्दल जेएनपीए ट्रस्टी व जेएनपीटी कामगार एकता संघटनेचे अध्यक्ष दिनेश पाटील यांनी गुणगौरव सोहळा व स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला होता. त्यानुसार त्यांनी जेएनपीए टाऊनशीप क्लब येथे विहंग याच्या सत्काराचे आयोजन केले होते.

दिनेश पाटील यांनी मान्यवर पत्रकारांच्या उपस्थितीत विहंग कडू याचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. यावेळी दिनेश पाटील यांनी आपल्या मनोगतात विहंग याच्या यशाबद्दल अभिनंदन करून कडू कुटूंबियांचेही अभिनंदन केले. तसेच यापुढे तालुक्यातील सर्व पत्रकारांच्या मुलांचा विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा हा लवकरच जेएनपीए चेअरमन यांच्या हस्ते करण्यात येईल असा विश्वास व्यक्त केला. त्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## नारीशक्ती अध्यक्षपदी वर्षा जांबेकर

**कोलाड :** आमडोशी येथील बँक सखी तथा सामाजिक कार्यकर्त्या वर्षा वासुदेव जांबेकर यांची नारिशक्ती सामाजिक महिला संस्थेच्या रोहा तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. या बाबतचे नियुक्ती पत्र महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष राहुल भापकर, सचिव हेमलता निंबाळकर यांनी नुकतेच दिले. नारीशक्ती सामाजिक संस्था संपूर्ण महाराष्ट्रात महिलांसाठी सामाजिक काम करीत आहे. वर्षा जांबेकर या बँक सखी म्हणून काम करीत असुन विविध सामाजिक कार्यात त्या सक्रिय आहेत. वर्षा यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## इतिहासाची साक्षीदार ‘आसा’ मशिदीची दुरावस्था

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

**चौलला ऐतिहासिक महत्व असून येथील पुरातन मंदिरे, प्राचीन वास्तू चौलच्या वैभवाचे साक्षीदार आहेत. चौल येथील राजकोट किल्ला मराठयांच्या हल्लात जमीनदोस्त झाला. मुसलमान अमदानीत चौलमध्ये प्रांताधिकारांचे मुख्यालय असावे असे हमामखाना, हजामखाना, कबरस्तान, कलावंतीचा वाडा आदी अनेक वास्तूने सिध्द होते. चौल मुघल अमदानीत भक्तीस्थान असावे, असे येथील दगडी बांधकामाची आसा मशिद पाहिल्यावर दिसून येते.**



चौलनाक्यावरून आग्राव, शितळादेवीकडे जाताना काटकर आळीकडे जाण्याचा मार्ग आहे. येथील हमामखान्याच्या काही अंतरावर कुंडलिका समुद्र खाडी किनारी लगत दगडी बांधकामाची आसा मशिदीचे अवशेष आहेत. चौल काटकर आळीतील नारळ सुपारीच्या बागायतीकडून या आसा मशिंदीकडे जाण्याचा मार्ग आहे. दगडी बांधकामाची आसा मशिदीचे पुर्णतः दुरावस्थेतील अवशेष आढळतात. या आसा मशिदीचे बांधकाम पाहिले असता मुघल अमदानीत येथे भक्तीचे मोठे स्थान असावे असे दिसून येते.

आसा मशिद पुर्णतः भग्नावस्थेत असून तिचे दगडी बांधकामाचे अवशेष अदयापी भक्कम स्थितीत आहेत. आसा मशिदीचे उभ्या दगडी खांबावर कोरीव व रेखीव नक्षीकाम पहाण्यासारखे आहे. आसा मशिदी पुर्णतः मोडकलीस व दुरावस्थेत असून सुध्दा तिचे आठ ते दहा दगडी बांधकामाचे अवजड खांब प्राचीन बांधकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. आसा मशिदीच्या वरील बाजूस दगडी बांधकामाचा घुमट अदयापी मजबूत दिसून येतो. ही आसा मशिद दोन मजली इमारतीची असावी असे तिचे दगडी बांधकाम पहाताना दिसते. आसा मशिदीचा पाया सुध्दा दगडी बांधकामाचा असून अदयापी कणखर आहे.

वरील बाजूकडील पडझड व दुरावस्थेने आसा मशिद मोडकलीस आली आहे. मात्र आसा मशिदीचे बांधकाम प्राचीन बांधकामाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून पहाण्यासारखा आहे. पुरातत्व खात्याने या प्राचीन आसा मशिदीकडे दुर्लक्ष केले असल्याचे निश्चित जाणवते. या आसा मशिदीकडे जाण्याचा मार्गफलक तसेच येथे आसा मशिदी सभोवतालची झाडे झूडपे यांची सफाई केली तर पर्यटक तसेच इतिहास प्रेमींना आसा मशिद पहाताना निश्चित प्राचीन इतिहासाच्या उत्कृष्ट बांधकाम पहाण्याचे भाग्य लाभेल.

## आदिवासी समाज संघटनेच्यावतीने वृक्षारोपण



**। नेरळ । वार्ताहर।**

कर्जत तालुका आदिवासी संघटनेच्यावतीने वन विभागाच्या मदतीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता. कर्जत तालुका आदिवासी समाज संघटना ही नेहमीच सामाजिक, शैक्षणिक कार्यात अग्रेसर असून विविध उपक्रम राबवत असते.

शासनाच्यावतीने १ जुलै ते ७ जुलै दरम्यान वन महोत्सव राबविला जातो. या निमित्ताने आदिवासी समाज संघटनेकडून दरवर्षी वृक्षरोपण केले जाते. संघटनेचे उपाध्यक्ष मंगळ केवारी यांनी संघटनेला दोन एकर जमीन दान केली आहे. त्या जागेत वृक्ष लागवड करण्यात आली. त्यावेळी १०० रोपांची झाडे लावा, झाडे जगवा, असा नारा देण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा, उपाध्यक्ष मंगळ केवारी, सचिव भगवान भगत, कर्जत पंचायत समितिच्या माजी उपसभापती जयवंती हिंदोळा, सह सचिव आणि खजिनदार अर्जुन केवारी, दत्तात्रेय हिंदोळा, काशिनाथ पादीर, दशरथ पारधी, काळूराम वारघडा, लक्ष्मण उघडे, अरुण केवारी, अर्जुन खंडवी, वनविभाग कर्मचारी केंद्रे तसेच संघटनेचे कार्यकर्ते यांनी वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेतला.

वृक्ष लागवड केल्यानंतर त्यांचे संगोपन करण्याचेही सर्वांनी मान्य केले. नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# नेरळमधील खड्डे देताहेत अपघाताला आमंत्रण



। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ गावातील रस्त्यांवर काही ठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. त्यातच मुसळधार पडत असलेल्या पावसामुळे खड्ड्यांचे प्रमाण वाढत असून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि नेरळ विकास प्राधिकरण यांनी या रस्त्याची डागडुगी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष

रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत अशी ओळख असलेल्या नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. शहरातील रस्ते खड्डेमय झाले असून त्या रस्त्यातून नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावरील मोठंमोठ्या खड्ड्यांमुळे अपघातांची मालिका सुरु आहे. नेरळ मातोश्री नगरच्या प्रवेश द्वाराजवळ कोल्हारे रस्त्यावर मोठा खड्डा पडला आहे. मुसळधार पाऊस पडत असल्याने ते खड्डे पाण्याने भरतात. यामुळे या खड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे अनेक दुचाकींचा अपघात होत आहे. नेरळ-कळंब मार्गावरील गंगानगर येथील रस्त्यावर देखील मोठे खड्डे पडले आहेत.

आता पावसाळा सुरु होऊन फक्त एक महिना झाला असून शहरातील रस्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यामध्ये खड्डे पडायला सुरुवात झाली आहे. पावसाचे पाणी या खड्ड्यांमध्ये साचले असल्याने या खड्ड्यांमुळे वाहन चालकांना प्रवास करताना त्रासदायक ठरत आहे. मागील काही दिवसांत या खड्ड्यांमुळे अनेक विचित्र अपघात घडले आहेत. नेरळ गावातील मुख्य सर्व रस्ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून करण्यात आले. त्या काँक्रीटच्या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून त्या खड्ड्यांची दुरुस्ती एमएमआरडीएने करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत. हेटकर आळी भागात पडलेले खड्डे चुकविण्यासाठी वाहनचालक चुकीच्या मार्गाने वाहने चालवतात आणि त्यामुळे तेथे मोठा अपघात होऊ शकतो. तर, नेरळ गावातील काही रस्ते नेरळ विकास प्राधिकरणाकडून करण्यात आले आहेत. हे लक्षात घेऊन नेरळ प्राधिकरण आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाने रस्त्याची दुरुस्ती तात्काळ करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# म्हसळा तालुका पाण्याखाली

। म्हसळा । वार्ताहर ।

जिल्ह्यात अनेक ठिकाणी रविवार मध्यरात्रीपासून मुसळधार पावसाला सुरूवात झाली आहे. मुंबई, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत विविध ठिकाणी पावसाचा जोर वाढला आहे. तालुक्यात जुलै महिन्यातील दुसऱ्या पंधरवड्यांत पावसाने विश्रांती घेतल्याने बळीराजाचे लक्ष पावसाकडे लागले होते. मात्र, मागील तीन दिवसांपासून पावसाने पुन्हा जोर धरला असून तालुक्यात सर्वत्र तारांबळ उडाली आहे.

तालुक्यातील नद्या, नाले, ओढे जोरदार ओसंडून वाहत असून म्हसळा शहरातून मुंबई आणि इतरस्त्र जाणारे म्हसळा-माणगाव साई मार्ग आणि म्हसळा-माणगाव गोरेगाव मार्ग पूर्णपणे बंद ठेवण्यात आला आहे. देवघर येथील नदी दुतर्फा ओसंडून वाहत असल्याने हा रस्ता बंद ठेवण्यात आला असून देहेन-नर्सरी रस्त्यावर प्रचंड वृक्ष पडल्याने गोरेगाव मार्ग वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे.
रायगड जिल्ह्यातील काही भागात तीव्र ते अती तीव्र पाऊस पडेल, असा इशारा हवामान खात्याने दिला असल्याने येत्या काही तासात जोरदार पाऊस पाडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. म्हसळा-तळा रस्त्यावरील ढोरजे पुलावरून पाणी वाहत असून तळा तालुक्याशीही संपर्क तुटला आहे. गेल्या २४ तासात सुतारवाडी-कुंभळे रस्त्यावर दरड कोसळण्याने, तसेच, देहेन-नर्सरी रस्त्यावर वृक्ष कोसळल्यामुळे मार्ग बंद झाला असून घोणशे घाटात दरड कोसळल्याने माणगावला जाणारी वाहतूक ठप्प झाली आहे. सुदैवाने तालुक्यात कुठेही मनुष्यहानी अगर अनुचित प्रकार घडल्याची माहिती प्राप्त झालेली नाही.



# ग्रामीण भागात विजेचा खेळखंडोबा




। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यातील वांजळोशी, तळेगाव व पन्हेली या तीन ग्रामपंचायतींतर्फे वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे महावितरणला निवेदन देण्यात आले. या तीन ग्रामपंचायतींच्या हद्दीत बोरीचा माल, चोरवली, कासेखोल, गणेशनगर आदी गावे येत असून या गावांना वारंवार वीजपुरवठ्यापासून कायम वंचित राहावे लागत आहे. ही सर्व गावे महावितरण विभागाला वेळोवेळी सहकार्य करीत असूनही फेब्रुवारी महिन्यापासून येथील वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. त्यातच पावसाळ्याचे दिवस सुरू असून या गावांचा वीजपुरवठा चार-चार दिवस खंडित होत आहे. ही गावे ग्रामीण भागात येत असल्याने काही नागरिकांचे व्यवसाय व पाणीपुरवठा योजना या विजेवर अवलंबून आहेत. मात्र, वारंवार खंडित होणाऱ्या विजपुरवठ्यामुळे येथील नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे या गावांचा वीजपुरवठा सुरळीत व निरंतरपणे सुरू ठेवावा, अशी मागणी महावितरण विभागाला करण्यात आली आहे.





● रविवारी रात्री पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे हार्बर मार्गावर पाणी साचल्याने पनवेल-सिएसटी मार्ग पुर्णपणे ठप्प झाला असल्याने फक्त वाशीपर्यंत रेल्वे जात होती. यामुळे चाकरमान्यांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले असून पनवेल स्थानकात मोठी गर्दी झाली होती. तसेच, रेल्वेने मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांची पावले पनवेल एसटी डेपोकडे वळली होती. दादर, मुंबईकडे जाण्यासाठी प्रवाशांची संख्या वाढल्याने जादा गाड्या सोडण्यात आल्या होत्या.





● बामणगाव येथील रहीवासी भगत यांच्या घरावर तसेच गोठ्यावर पिंपळाचे मोठे झाड पडले. यात गोठ्याचे प्रचंड नुकसान झाले असून गोठ्यातील जनावरे देखील जखमी झाली आहेत. तसेच, येथील शेतावर जाणारा लोखंडी पूलही वाहून गेला आहे.



● दोन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसाने पनवेल तालुक्यातील मोर्बे धरण वाहायला सुरुवात झाली आहे.

# संगम नदीला पूर

। तळा । वार्ताहर ।

दोन दिवसांपासून सतत कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे तळा तालुक्यातील संगमनदीला पूर आला आहे. दिवसरात्र कोसळणाऱ्या पावसामुळे संगम नदीला पूर येऊन संगम पूल पाण्याखाली गेल्याने बेलघर, चरई, तळेगाव, पन्हेळी, गणेश नगर, कासेखोल आदी गावांचा संपर्क तुटला आहे. यामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यात चोवीस तास पाऊस पडत असून मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने संगम पुलाबरोबर आजूबाजूची शेतीही पाण्याखाली गेली आहे. पावसाचा वाढता जोर पाहता परिस्थिती अशीच राहिली तर भात पिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेच वातावरण पसरलेले आहे. प्रशासनाकडून नदीच्या आसपासच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरडग्रस्त भागातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे व पुराच्या पाण्यातुन वाहने चालवू नयेत, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.



# झाडावर बसल्याने वाचला जीव

। पनवेल । प्रतिनिधी ।

रविवार पासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेकांना घराबाहेर पडता आले नाही. यातच वलप गावाजवळील तळोजा कासाडी नदीला देखील महापूर आला होता. या ठिकाणी कामासाठी जात असलेले रामचंद्र गायकवाड हे तब्बल दोन तास झाडावर अडकून बसले होते. पाण्याचा प्रवाह जास्त होता. याची माहिती अग्निशामक दलाला देण्यात आल्यानंतर अग्निशामक दलाची गाडी देखील पाण्याच्या प्रवाहात पुढे येत नव्हती. त्यामुळे गाडी इथेच थांबवण्यात आली. त्यानंतर तळोजा अग्निशामक दल, सिडको अग्निशामक दलाने अथक प्रयत्न करून रामचंद्र गायकवाड यांची बांबू आणि रस्सीच्या सहाय्याने सुटका केली. मुसळधार पावसात कोणीही जाऊ नये आणि नदीच्या प्रवाहात जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.



● अलिबाग तालुक्यातील रांजणखार डावली येथील घरात पुराचे पाणी घुसले असून रहिवाशांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे.



● अलिबाग तालुक्यातील खंडाळे येथील माजी सरपंच संतोष गुरव यांच्या शेतीचे नुकसान.





● रविवारी मध्यरात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे अलिबाग शहरातील पेट्रोल पंप, बायपास मार्ग पाण्याखाली गेला होता. त्यामुळे येथून वाहने चालवत असताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत होती. मुसळधार पडणारा पाऊस आणि हवामान खात्याने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी रायगड जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर केली होती. यामुळे अलिबाग शहरातील शाळा महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती.
( छायाचित्र- समीर मालोदे)

# उधाणाची भरती नैसर्गिक आपत्तीच

## उधाणाचा नैसर्गिक आपत्तीत समावेश करा;शेतकऱ्यांनी वेधले शासनाचे लक्ष

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**पावसाळ्यात समुद्राला उधाणाची भरती येते. या उधाणाच्या भरतीचा रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टीवरील भागांना तडाखा बसतो. भरतीचे खारेपाणी शेतात आणि गावांत शिरून पूरसदृश्य परिस्थिती उद्भवते. या उधाणाच्या भरतीच्या तडाख्यात शेतातील पिकांचे आणि गावातील घरांचे अतोनात नुकसान होते. हि नुकसान भरपाई मिळविण्यासाठी शेतकरी आटापिटा करतात परंतु नैसर्गिक आपत्तीत या उधाणांचा समावेश नसल्याने शेतकरी मदतीपासून वंचित राहतात. यामुळे समुद्राला येणाऱ्या मोठ्या उधाणांचा नैसर्गिक आपत्तीत समावेश करण्यात यावा अशी मागणी रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.**



शासनाच्या निकषानुसार पूर, अतिवृष्टी, दरड, वादळे यांचा नैसर्गिक आपत्तीत समावेश होत असला तरी, समुद्राला येणाऱ्या उधाणांचा नैसर्गिक आपत्तीमध्ये समावेश करण्यात आलेला नाही. शासनाच्या या धोरणाचा फटका दरवर्षी पावसाळ्याच्या दिवसात किनारपट्टी भागातील शेतकरी आणि गावांना बसतो आहे. समुद्राला येणाऱ्या उधाणांचा गेल्या दोन दशकात मोठा फटका बसला आहे. अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागातील शेती उधाणाच्या तडाख्यामुळे कायमची नापिक झाली आहे. पूर्वी ज्या ठिकाणी शेती केली जात होती. अशी साडे तीन हजार हेक्टर क्षेत्रावर आज कांदळवने पसरली आहेत. येथील शेतकरी शेतीपासून कायमचे दूरावले गेले आहेत. यात प्रामुख्याने माणकुळे, बहिराचा पाडा, नारंगी खार, रामकोठा, सोनकोठा, हाशिवरे, कवाडे, फुफादेवी, मेढेखार, मिळकतखार, शहाबाज यासारख्या गावातील शेतजमिनींचा समावेश आहे. मात्र शेती नापिक होऊनही शेतकऱ्यांना शासनाकडून एक रुपयाची मदत मिळू शकलेली नाही.

कोकणात रायगड, रत्नागिरी, ठाणे आणि पालघर या पाच जिल्ह्यात ४९ हजार ११३ हेक्टर येवढे खारभूमी लाभक्षेत्र आहे. यात रायगड जिल्ह्यातील २१ हजार २९६ हेक्टर खारभूमी क्षेत्राचा समावेश आहे. यातील अलिबाग तालुक्यातील ३ हजार ०१६ हेक्टर खारभूमी क्षेत्र उधाणामुळे कायमचे नापिक झाले आहे. याची दखल घेऊन राज्य सरकारने समुद्री उधाणांना नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित करावे अशी मागणी श्रमिक मुक्ती दलाने सातत्याने केली आहे. मात्र त्यांच्या या मागणीकडे कोणत्याच सरकारने लक्ष दिलेले नाही. शासनाच्या या धोरणामुळे जमीन नापीक होऊन शेतकरी हवालदिल बनला आहे.

> **उधाणांमुळे शेती नापिक झाली आहेच, त्याचबरोबर शेतकरी आणि शेतमजूर बेरोजगार झाले आहेत. महत्वाची बाब म्हणजे शासनाच्या निकषांमुळे तीन हजार हेक्टरवरील शेतकऱ्यांना एक रुपयाची मदतही मिळू शकलेली नाही. दहा वर्षांपासून आम्ही शासनाकडे पाठपुरावा करत आहोत. पण काहीच उपयोग झालेला नाही.**
>
> **–राजन भगत**

# पडसरे पूल मोजतोय अखेरची घटका

**। सुधागड/पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील पडसरे गावाजवळील पुलाची प्रचंड दुरवस्था झाली आहे. पडसरे गावासह, लोळगेवाडी, एकलघर व अनुदानित आदिवासी आश्रम शाळेला जोडणारा हा एकमेव पूल आहे. पुलावरून ग्रामस्थांसह आश्रमशाळेतील शेकडो विद्यार्थी येथून येजा करतात. हा धोकादायक पूल असून संरक्षण कठडे तुटले असून मोठी दुर्घटना घडू शकते. शक्यता ना करता येऊ शकत नाही.

पडसरे आश्रमशाळेत सुधागड तालुक्यासह अलिबाग, पेण, खालापूर, रोहा या पाच तालुक्यातील एकूण पाचशे हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे इथे विद्यार्थी व त्यांच्या पालकांची सतत ये जा सुरू असते. विद्यार्थी गावी जाणे किंवा दवाखान्यात जाणे आदी कारणासाठी सतत वाहतुकीची वर्दळ असते. शिवाय गावकरी व आश्रमशाळेतील कर्मचारी वर्ग दैनंदिन गरजे साठी लागणाऱ्या साहित्याची ने-आण सुद्धा या पुलावरून करतात. या पुलाखालून मोठा धबधबा वाहतो. पुलाची सध्याची दुरवस्था आणि पावसाळ्यात धबधब्याच्या प्रवाहात हा पूल किती तग धरेल याची चिंता ग्रामस्थ, आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-पालकांना भेडसावत आहे. हे सर्वच जण जीव मुठीत घेऊन या पुलावरून प्रवास करत आहेत.

**पुलाची दुर्दशा**

**या पुलाच्या प्लास्टरमधून लोखंडी सळ्या बाहेर पडल्या आहेत. त्या अक्षरशः खाली लोंबकळत आहेत. तर काही खाली कोसळल्या देखील आहेत. पुलाचे संरक्षण कठडे तुटले आहेत. अनेक ठिकाणी प्लास्टर निघाले आहे. सर्वत्र गवताचे आच्छादन आहे. अशा प्रकारे अत्यंत वाईट अवस्था या पुलाची झाली आहे.**



# महाविद्यालयाने केले विद्यार्थ्यांचे स्वागत

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या कॉलेज ऑफ सायन्स,महाड महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयात नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना महाविद्यालयाची, महाविद्यालयाच्या कामकाजाची व महाविद्यालयात वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची ओळख व्हावी व माहिती मिळावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या कामकाजाबद्दल तसेच राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांबद्दल माहिती देण्यात आली. कॉलेजचे प्राचार्य सुदेश कदम यांनी विद्यार्थ्यांना हिरवळ संस्थेविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तसेच हिरवळ रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य राकेश वडवळकर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना नवीन शैक्षणिक धोरण एनइपी २०२० नुसार बदलेल्या अभ्यासक्रम व परीक्षा पध्दती विषयी मार्गदर्शन केले. तसेच इतर शिक्षक वृंदानी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती देऊन त्यांना त्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले.

# महादेव शिर्के यांचे वृद्धापकाळाने निधन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्याजवळील कडसुरे येथील ज्येष्ठ नागरिक व पिगोंडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच महादेव शिर्के, (वय ९८) यांचे बुधवारी (दि. ३) निधन झाले. महादेव शिर्के यांच्या पार्थिवावर कडसुरे येथील स्मशानभूमीत गुरुवारी (दि.४)अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नागोठणे परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, शिर्के यांचे सगे-सोयरे, नातेवाईक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



त्यांच्या पश्चात केशव, दत्तात्रेय, रमेश, विलास हे चार विवाहित मुलगे, मालती ठमके ही विवाहित मुलगी, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

## माजी नगरसेवक सरसावले मदतीला

**पनवेल :** मुसळधार पावसामुळे कळंबोली वसाहतीत पाणी साठल्याने अनेक बैठ्या घरात पाणी शिरल्याने धास्तावलेल्या रहिवाशांच्या मदतीला माजी नगरसेवक आणि राजकीय पुढारी धावल्याचे पाहायला मिळाले.धस्तावलेल्या या नागरिकांना धीर देण्यासाठी राजकीय पुढारी सरसावले होते या मध्ये प्रभाग क्रमांक ८ चे माजी नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा अध्यक्ष सतीश पाटील आणि प्रभाग क्रमांक १० चे माजी नगरसेवक आणि शेकापक्षाचे युवा नेते रवींद्र भगत आघाडीवर असल्याचे पाहायला मिळाले.

# मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**। उरण । वार्ताहर ।**

रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे उरण महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघ आणि आरोग्य केंद्र समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन उरण रानसई येथील प्राथमिक शाळेच्या समाज मंदिर हॉल येथे करण्यात आले होते.



गरजवंतांच्या मदतीकरिता सदैव मदतीचा हात पुढे करणारं रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे उरण महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुधीर घरत यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपल्या सहकार्यातून उरण शहरांत मोठं नावं असणारं उरण वैद्यकीय अधिकारी वर्ग आणि गिरी रुग्णालय आणि गिरी रुग्णालयाचे डॉ.व्यंकटेश गिरी, डॉ.अमोल गिरी, डॉ.नितीन गांडीगुडे यांच्या संयोजनातून आणि माजी विद्यार्थी संघ आणि आरोग्य केंद्र समिती यांच्या आयोजनातून आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. रानसई प्राथमिक शाळा समाजमंदिर हॉल येथे आयोजित शिबिरात शरीराच्या अनेक तपासण्या करण्याकरिता आणि उपचार घेण्याकरिता रानसई आदिवासी वाड्यांवरील अनेक आदिवासी बांधव, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आरोग्यवर्धक रानभाज्यांची खाद्य संस्कृती

**। पाली । वार्ताहर ।**

**पावसाळ्यात पाली सुधागड सह रायगड जिल्ह्यातील रानावनात व रानमाळावर विविध रानभाज्या बहरल्या आहेत. या विशेष हंगामात मिळणाऱ्या आरोग्यवर्धक रानभाज्यांचे सेवन केल्याने आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. रोजच्या आहारात या रानभाज्यांचा समावेश असतो. जिल्ह्यात या रानभाज्यांची वैशिष्ट्यपूर्ण खाद्य संस्कृती निर्माण झाली आहे.**



या रानभाज्या मोठ्या प्रमाणात बाजारात उपलब्ध होत आहेत. आदिवासी महिलांना या रानभाज्या विकून चांगला रोजगार देखील मिळतो. तसेच जिल्ह्यात अनेक ठिकाणी रानभाज्या महोत्सव व पाककृती महोत्सव भरले जात असल्याने रानभाज्यांबाबत जनजागृती होत आहे. तसेच व्यवसाय सुद्धा मिळत आहे. याचवेळी आदिवासी बांधवांकडून भाजी विकत घेताना काटकसर करू नये असे म्हटले जातेय.रानभाज्या आपोआप उगतात. कोणतही खत किंवा कीटकनाशक न वापरता पूर्णपणे नैसर्गिक पद्धतीने उगवलेल्या या रानभाज्या म्हणजे पावसाळ्यातील आरोग्यदायी पर्वणीच असते.

रानभाज्या या औषधी असतात, त्यामुळे पावसाळ्यात आरोग्य चांगले राहते. म्हणून जिल्ह्यात कृषी विभाग, कृषी पर्यटन करणारे व समाजसेवी संस्थांच्या माध्यमातून रानभाज्यांचे महोत्सव सुद्धा भरवले जातात.

सुधागड तालुक्यातील उद्धर येथील प्रयोगशील शेतकरी तुषार केळकर यांनी आपल्या आत्मतृप्ती या कृषी केंद्रावर जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातील प्रत्येक शनिवार व रविवारी रानभाजी महोत्सवाचे आयोजन केले आहे.

मागील अनेक वर्ष ते अशाप्रकारे रानभाज्या महोत्सव भरवत आहेत. या महोत्सवात मुंबई, पुणे आदींसह विविध शहरातील नागरिक, मुले, महिला आवर्जून सहभागी होतात. या रानभाज्या महोत्सवात त्यांना विविध रानभाज्यांची प्रत्यक्ष ओळख करून दिली जाते. जंगलामध्ये फिरून रानभाज्या कशा प्रकारे उगवल्या जातात त्याची माहिती दिली जाते. आणि याचबरोबर रानभाज्या काढून त्याची पाककृती करून ती सर्वजण मिळून खातात. अशाप्रकारे हा रानभाज्या महोत्सव अतिशय उत्कृष्टपणे साजरा केला जातो.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत जिल्ह्यातील जिल्हा तालुका स्तरीय रानभाज्या व पाककला महोत्सवाचे आयोजन केले जाते. ज्या माध्यमातून रानभाज्यांची शास्त्रशुद्ध माहिती तर मिळतेच पण स्थानिक शेतकरी व महिला बचत गटांना रोजगार देखील उपलब्ध होतो.

कौला/कैलाच्या पानांची भाजी, जिवतीच्या फुलांची भाजी, कुर्डू, कुळी, टाकळा आणि आम्लीच्या पानांची एकत्रित पंचभेळी भाजी करतात. बऱ्याच रानभाज्यांची मिळून एक मिसळ भाजी करतात. देठी, देवभात, भारंगी, चाव्याचा बार/शेंडवेल, चिचार्डी, मेकी, पाथरी, रानअळू व केनी आदी भाज्यांची भाजी करतात. चवळीच्या पानांचे बेसन घालून मुठे करतात. सुरण, आळूकंद, करंदकंद आणि काशी कोहळा यांची भाजी करतात.

खरशिंग, दिंडा, लोथ, पेटा, भारंगी, अळू, तेरुली, फांगली, टाकळा, अग्निशिखा, रानतुळस, बांबू कोंब, रताळ्याचे कोंब, कवदर, कैला, टरली, कसविंदा , कुड्याच्या शेंगा, अक्रोड कुरडू अशा विविध प्रकारच्या रानभाज्या आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक उमा बाबुराव कोल्हे रा. मु. १३८ श्रीबाग नं. २ अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र ( हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव<br>ता. अलिबाग<br>जि. रायगड | ११३४ | ०-२०-८०<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकूण ०-२२-६० | ५.१२ |

वर नमुद मिळकत उमा बाबुराव कोल्हे यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जावहिवाटीतील क्षेत्र ०-०२-६० हे. आर. भातशेती मिळकत

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ०८/०७/२०२४

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर गाळा क्र. ३ ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राजेश रामचंद्र फडके, रा. रूम नं. ९०, हनुमान मंदिर जवळ, सेक्टर १३, खारघर गाव, खारघर, जि. रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४२/२/ब | ०.८४.७०<br>पो.ख. ०.०१.३०<br>एकूण ०.८६.०० | ३.४६ | श्री. पुरूषोत्तम पांडुरंग शिंदे, वगैरे. |

यापैकी श्री. पुरूषोत्तम पांडुरंग शिंदे यांच्या हिश्श्याचे ०.२८.०० हे.आर.पॉ.क्षेत्र

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०९/०७/२०२४

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास, नानामास्तरनगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अरूण गजानन शिंदे व श्री. समीर अरूण शिंदे, रा.जेएन-२/४६/ए-७, जय महाराष्ट्र असोसिएशन, सेक्टर ९, वाशी, नवी मुंबई, ठाणे ४०००७३, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७०/४ | १.८७.००<br>पो.ख. ०.२२.००<br>एकूण २.०९.०० | १.४५ | श्री. मंगेश भाईचंद ओसवाल व श्री. मनोज भाईचंद ओसवाल |

यापैकी विक्री क्षेत्र १.००.०० हे.आर.पॉ.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०९/०७/२०२४

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास, नानामास्तरनगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४५/अ/१ हिस्सा नं. १ ब १ क, प्लॉट क्र. १ या बिनशेती मिळकतीवरील ''वामन को. ऑप. हौसिंग सोसायटी'' या निवासी इमारतीमधील, निवासी सदनिका क्र. ०६, पहिला मजला, क्षेत्र ७८० चौ. फुट बिल्टअप (७२.४९ चौ.मी.) अलिबाग नगरपरिषद म्युन घर क. ८७७/पहिला /ब्लॉक क्र.२ ही निवासी सदनिका या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक रिझवान इसाक साखरकर रा. नविन भाजीमार्केट, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू निवासी सदनिका निर्वेध असल्याचा भरवसा निवासी सदनिकेचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू निवासी सदनिकेवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास निवासी सदनिका निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०८/०७/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

**निवडक**

## शीतल मगडे मुंबई संघात

**रोहा :** तालुक्यातील खांबेरे गावची रहिवासी असणारी शितल मेंगडे हिची बालेवाडी होणाऱ्या ७१ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद वरिष्ठ गट महिला निवड चाचणी स्पर्धेसाठी मुंबई शहर संघातून निवड झाली आहे. खांबेरे सारख्या दुर्गम गावातून मुंबईत जाऊन मराठी मातीतील कबड्डी या खेळात विशेष प्राविण्य दाखवत शितल मेंगडे हिने मुंबई संघात स्थान मिळविल्याने तिच्यावर रायगड जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शितल या स्पर्धेत नक्कीच यश संपादन करेल असा विश्वास आहे.

## तिघांना मिळणार पाच कोटी

**नवी दिल्ली :** बीसीसीआयने विजेत्या संघाला १२५ कोटी देण्याची घोषणा केली. त्यामुळे संघातील १५ खेळाडूंना पाच, पाच कोटी मिळणार आहेत. या पंधरा खेळाडूंमध्ये तीन खेळाडू असे आहेत. जे एकही सामना खेळले नाहीत. टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनाही एकूण बक्षीस रकमेपैकी ५ कोटी रुपये बक्षीस म्हणून दिले जाणार आहेत. संघात असणारे यशस्वी जैस्वाल, संजू सॅमसन आणि युजवेंद्र चहल हे संघात होते पण त्यांनी एकही सामना खेळला नाही. परंतु त्यांना प्रत्येकी ५ कोटी रुपये मिळणार आहेत.

## जयसूर्या संघाचा प्रशिक्षक

**श्रीलंका :** भारताविरुद्धच्या टी-२० आणि एकदिवसीय मालिकेदरम्यान सनथ जयसूर्या श्रीलंकेच्या संघाचा प्रशिक्षक असणार आहे. त्याने स्वतः एफपी या वृत्तसंस्थेला ही माहिती दिली. ख्रिस सिल्व्हर वुड गेल्यापासून श्रीलंका संघाचे मुख्य प्रशिक्षकपद रिक्त आहे. २० विश्वचषकात श्रीलंकेच्या खराब कामगिरीनंतर मुख्य प्रशिक्षक ख्रिस सिल्व्हरवुड आणि सल्लागार प्रशिक्षक महेला जयवर्धने यांना पदावरून पायउतार केले. जयसूर्याला इंग्लंड दौऱ्यात संघाचे प्रशिक्षकपद देण्याची ऑफर दिली होती. जी जयसूर्याने स्वीकारली आहे.

## रोहितच्या नेतृत्वात जिंकणार

**मुंबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शहा यांनी सांगितले की, टी-२० विश्वचषकानंतर आम्ही रोहितच्या नेतृत्वाखाली २०२५ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल जिंकू. मी राजकोटमध्ये सांगितले होते, की जून २०२४ मध्ये आम्ही मने जिंकू आणि चषक देखील. भारतीय ध्वजही लावणार असून आमच्या कॅप्टनने झेंडा लावला आहे. या विजयात शेवटच्या पाच षटकांचा मोठा वाटा होता. या योगदानाबद्दल मी सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग आणि हार्दिक पंड्या यांचे आभार मानू इच्छितो.

## रवी शास्त्रींनी सुनावले

**मुंबई :** माजी भारतीय क्रिकेटपटू आणि कॉमेंटेटर रवी शास्त्री म्हणाले की, मायकेल वॉनने कधीही आयसीसी ट्रॉफी उचलली नाही. त्यामुळे त्यांचा आयसीसीवरही विश्वास नाही. माजी इंग्लिश कर्णधार वॉनने म्हटले होते की, आयसीसीने टी-२० विश्वचषक स्पर्धेचे वेळापत्रक भारताच्या हिशोबाने केले आहे. वॉनच्या वक्तव्यावर रविचंद्रन अश्विन यांनीही जोरदार टीका केली होती. वॉनने असेही म्हटले होते की, गयाना हे आधीच भारतासाठी उपांत्य फेरीचे ठिकाण होते. जे इतर संघांसाठी अन्यायकारक होते. या आधी देखील त्याने असाच आरोप केला होता.

# भारताने पराभवाचा वचपा काढला

## ■ दुसरा ट्वेंटी-२० सामना जिंकून भारताने मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली

**। हरारे । वृत्तसंस्था ।**

**झिम्बाब्वे दौऱ्यावर असलेल्या टीम इंडियाने रविवारी झालेला दुसरा सामना जिंकला. पहिल्या सामन्यातील पराभवाचा वचपा काढण्यात भारताच्या युवा सेनेला यश आले. पाच सामन्यांच्या ट्वेंटी-२० मालिकेतील दुसरा सामना जिंकून भारतीय संघाने १-१ अशी बरोबरी साधली. ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ मध्ये खेळलेल्या वरिष्ठ खेळाडूंना या मालिकेतून विश्रांती देण्यात आली आहे. भारताने दिलेल्या २३५ धावांच्या तगड्या आव्हानाचा पाठलाग करताना यजमान झिम्बाब्वेच्या संघाला चांगलाच घाम फुटला होता.**




भारतीय गोलंदाजांनी सांघिक कामगिरी करताना प्रतिस्पर्धी संघाला अवघ्या १३४ धावांत रोखले. यजमान संघ १८.४ षटकांत सर्वबाद केवळ १३४ धावा करू शकला. त्यांनी हा सामना १०० धावांनी गमावला. झिम्बाब्वेकडून वेस्ले मधेवी वगळता एकाही फलंदाजाला साजेशी खेळी करता आली नाही. त्याने १ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ३९ चेंडूत ४३ धावा केल्या.

भारताकडून आवेश खान आणि मुकेश कुमार यांनी ३-३ बळी घेतले, तर रवी बिश्नोई (२) आणि वॉशिंग्टन सुंदरला (१) बळी घेण्यात यश आले. तत्पुर्वी, अभिषेक शर्माने स्फोटक खेळी करताना ८ षटकार आणि ७ चौकारांच्या मदतीने ४६ चेंडूत शतक झळकावले. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने निर्धारित २० षटकांत २ बाद २३४ धावा केल्या.

शतक झळकावल्यानंतर पुढच्याच चेंडूवर तो बाद झाला. अभिषेकने गायकवाडसोबत दुसऱ्या गड्यासाठी १३७ धावांची भागीदारी नोंदवली. ऋतुराज गायकवाडने सुरुवातीला संथ गतीने धावा केल्या. मग त्याच्या गाडीने वेग पकडताना धावगती वाढवली. ऋतुराज ४७ चेंडूत ७७ धावा करून नाबाद झाला. अखेरच्या काही षटकारांमध्ये रिंकू सिंगने स्फोटक खेळी केली. त्याने ५ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने २२ चेंडूत ४८ धावांची शानदार खेळी केली.

ऋतुराज आणि रिंकू ही जोडी नाबाद परतली. विशेष बाब म्हणजे भारताने शेवटच्या १० षटकांत १ गडी गमावून तब्बल १६० धावा कुटल्या. शतकवीर अभिषेक शर्माला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# राहुल द्रविडला भारतरत्न द्यावा

## सुनील गावसकरांची सरकारकडे मागणी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचे माजी फलंदाज सुनील गावसकर यांनी माजी खेळाडू आणि भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान देण्याची मागणी केली आहे. द्रविडचा प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ टी-२० विश्वचषक फायनलनंतर संपला. टीम इंडियाला टी-२० विश्वचषक चॅम्पियन बनवण्यात राहुल द्रविडचा मोठा वाटा आहे. प्रशिक्षक म्हणून द्रविडच्या नेतृत्वाखाली अनेक स्पर्धेत टीम इंडियाने यश मिळवले आहे. ज्यामध्ये वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप आणि एकदिवसीय विश्वचषक २०२३ चे उपविजेते होण्याचा समावेश आहे. याशिवाय द्रविडच्या नेतृत्वाखाली संघाने आशिया कपचे विजेतेपदही पटकावले. प्रशिक्षक असण्यासोबतच द्रविडने भारतीय क्रिकेटमध्येही महत्त्वाचे योगदान दिले आहे. तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचा (एनसीए) प्रमुख होता आणि २०१८ मध्ये अंडर-१९ विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा प्रशिक्षक होता. एक खेळाडू म्हणून द्रविडने २४ हजार १७७ धावा केल्या आहेत. द्रविड यांचा प्रभाव मैदानावर आणि मैदानाबाहेरही प्रचंड राहिला आहे. सुनील गावसकर यांनी मिड डेसाठी लिहिलेल्या लेखात म्हटले आहे की, ''भारत सरकारने राहुल द्रविड याला भारतरत्न देऊन गौरव केला तर ते योग्य ठरेल. कारण त्याची कामगिरी खरोखरच या गौरवासाठी पात्र आहे. तो एक महान खेळाडू आणि कर्णधार आहे. ज्याने वेस्ट इंडिजमध्ये मालिका जिंकली आणि इंग्लंडमध्ये कसोटी मालिका जिंकणारा तिसरा भारतीय कर्णधार ठरला. सुनील गावसकर पुढे म्हणाले, ''वर्षाच्या सुरुवातीला समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या काही लोकांना भारतरत्न मिळाले होते. त्यांचे अत्यंत कट्टर समर्थकही मान्य करतील की त्यांचा प्रभाव मुख्यतः त्यांच्या पक्षापुरता आणि ज्या प्रदेशातून आले त्या भागापुरतेच मर्यादित होते. मात्र, राहुल द्रविड याची कामगिरी अशी आहे की त्यामुळे संपूर्ण देशाला आनंद झाला आहे. देशाच्या सर्वोच्च सन्मानासाठी द्रविड नक्कीच पात्र आहे. या देशाच्या महान सुपुत्राचा सरकारने सन्मान करावा.



# ख्रिस गेलचा झंझावात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेला गेल वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्मध्ये वेस्ट इंडिज चॅम्पियन्सकडून खेळत आहे. रविवारी संध्याकाळी दक्षिण आफ्रिकन चॅम्पियन्सविरुद्धच्या सामन्यात वादळी खेळी साकारत क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले.



वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्सच्या स्पर्धेतील ७ जुलैची संध्याकाळ खास होती. कारण या स्पर्धेत ख्रिस गेलचे झंझावाती वादळ पुन्हा पाहायला मिळाले. बर्मिंगहॅमच्या मैदानावर त्याने अवघ्या ४० चेंडूंमध्ये ७० धावांची दमदार खेळी केली. ज्यामुळे दक्षिण आफ्रिकेने दिलेले मोठे लक्ष्यही कमी पडल्याचे दिसले.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या चॅम्पियन्सने २० षटकांत ५ गडी गमावून १७४ धावा केल्या. आश्वेल प्रिन्स आणि डॅन विलास यांनी केलेल्या ४६ आणि ४४ धावांच्या नाबाद खेळीमुळे दक्षिण आफ्रिकेने या धावा केल्या. या दोघांशिवाय रिचर्ड लुईसने २० धावांची तर जेपी ड्युमिनीने २३ धावांची खेळी खेळली.

# नेदरलँड्स दोन दशकांनी युरो स्पर्धेच्या उपांत्य फेरीत

**। बर्लिन । वृत्तसंस्था ।**

नेदरलँड्सने युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत तुर्कीचा २-१ असा पराभव केला. त्यामुळे नेदरलँड्सला तब्बल २० वर्षांनी युरो स्पर्धेची उपांत्य फेरी गाठता आली.

सामन्याच्या ३५ व्या मिनिटाला सामेत अकायदिनच्या अचूक हेडरमुळे तुर्कीने आघाडी घेतली. उत्तरार्धात सामन्याच्या ७० व्या मिनिटाला डी व्रायने नेदरलँड्सला बरोबरी साधून दिली. सहाच मिनिटांनी मेर्ट मुलदूरकडून स्वयंगोल झाल्याने नेदरलँड्सला २-१ अशी आघाडी मिळाली आणि याच आघाडीवर त्यांचा विजय साकार झाला. नेदरलँड्सला २००४ नंतर प्रथमच युरो स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवता आले. त्या वेळी पोर्तुगाल येथे झालेल्या स्पर्धेत नेदरलँड्सने स्वीडनचा शूटआऊटमध्ये ५-४ असा पराभव केला होता.

यंदाच्या स्पर्धेत चमकदार कामगिरी केलेल्या गाकपोला तुर्कीने रोखण्याचा प्रयत्न केला. विश्रांतीला एका गोलने पिछाडीवर राहावे लागल्यानंतर उत्तरार्धात गाकपोला उंचपुरा आघाडीपटू व्हेघॉर्स्टची साथ मिळाली. ७० व्या मिनिटाला डिपाय आणि शौटन यांच्या एकत्रित प्रयत्नाला डी व्रायने पूर्ण स्वरूप दिले. त्याने हेडरच्यामार्फत मारलेला वेगवान फटका अडवण्याची तुर्कीचा गोलरक्षक गुनॉकला संधीच मिळाली नाही. त्यानंतर सहाच मिनिटांनी मैदानाच्या मध्यातून चेंडूचा ताबा घेऊन गाकपोने वेगाने मुसंडी मारली होती. त्याला रोखण्यासाठी तुर्कीचा मेर्ट मुलदूर कमालीच्या वेगाने धावत आला. मात्र, गाकपोचा क्रॉस झेपावून परतवून लावण्याच्या नादात त्याने चेंडू आपल्याच जाळीत मारला. तुर्कीने अखेरपर्यंत झुंज दिली. प्रथम बारिस यिल्माजचा प्रयत्न त्याने हाणून पाडला. भरपाई वेळेत किलिक्सोयने मारलेला हेडरचा फटका व्हरब्रुगेनने अप्रतिमरीत्या अडवला. अखेर मात्र तुर्कीला नमवले.



# क्रिकेटर तुपाशी पैलवान राहीले उपाशी

**। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक २०२४ च्या विजेतेपदावर भारतीय संघाने आपले नाव कोरल्यानंतर भारतीय संघावर बक्षिसांचा अक्षरशः पाऊस पडत आहे. बीसीसीआयने त्यांना १२५ कोटी रुपयांचे बक्षीस दिले. त्यानंतर राज्य सरकारने भारतीय संघासाठी पुन्हा ११ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले. एकीकडे क्रिकेटपटूंवर पैशांचा पाऊस पाडला जात असताना हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरीच्या मल्लांना गेले दहा महिने त्यांचे तुटपुंजे मानधनही मिळालेले नाही. मानधनासह अन्य खेळांसाठी भरीव निधी देण्याची गरज आहे.

कोल्हापूरला कुस्तीची पंढरी असे म्हटले जाते. खऱ्या अर्थाने छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी राजाश्रय देऊन या कलेला लोकप्रियता मिळवून दिली. गेल्या वीस वर्षात सरकार बदलले, क्रीडा खात्याचे अधिकारी आणि त्यांची मानसिकताही त्यांच्या बाबतीत बदलली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने मानधनाचा प्रस्ताव पाठविला आहे. मात्र, सरकारकडून मानधन दिलेले नाही. कोल्हापूर जिल्ह्यात तर विभागीय क्रीडा संकुलात जलतरण तलावासाठी चार कोटींहून अधिक पैसा पाण्यात गेला. मात्र, पैलवानांना सहा हजारांसाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. हे फारच संतापजनक आहे. हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी विजेत्या मल्लांना राज्य शासन प्रतिमहिना सहा हजार रुपये इतके मानधन देते. मात्र, हे मानधन गेल्या दहा महिन्यांपासून मिळालेले नाही. यावरच निर्वाह असलेल्या मल्लांना हाल अपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. आयुष्यातील उमेदीची वर्षे कुस्तीमध्ये घालविलेल्या मल्लांना उतारवयात मानधनासाठी तंगविले जात आहे. राज्याचा क्रीडा विभाग या मल्लांच्या मागणीला दाद देत नाही. वारंवार पत्रव्यवहार, विनंती अर्ज करून ही मंडळी आता थकली आहेत. रथी, महारथी पैलवान छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या दूरदृष्टीमुळे कोल्हापूरमध्ये पहिले ऑलिम्पिकला गेलेले दिनकरराव शिंदे, पहिले ऑलिम्पिकचे पदक विजेते खाशाबा जाधव, पहिले हिंदकेसरी श्रीपती खंचनाळे, पहिले महाराष्ट्र केसरी दिनकर दह्यारी, पहिले रुस्तम हिंद हरिश्चंद्र बिराजदार, पहिले डबल महाराष्ट्र केसरी गणपतराव खेडकर, पहिले महाराष्ट्र केसरी होऊन हिंदकेसरी झालेले दीनानाथ सिंह, हिंदकेसरी गणपतराव आंधळकर आबा, हिंदकेसरी हजरत पटेल, हिंदकेसरी मारुती माने, हिंदकेसरी विनोद चौगुले, हिंदकेसरी रुस्तम हिंद दादू चौगुले, डबल महाराष्ट्र केसरी लक्ष्मण वडार, कुस्तीसम्राट युवराज पाटील, राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेते राम सारंग असे एकापेक्षा एक पैलवान कोल्हापुरात घडले.

सरकारी सेवेत प्रशिक्षणार्थी कालावधी दोन वर्षाचा आहे. खेळाचा सराव आणि नोकरी यामुळे अनेकदा हा कालावधी पूर्ण होत नाही. हा कालावधी पूर्ण केला नसल्याने वेतन दिले जात नाही. सरकारी नियम आणि सरावाची सांगड बसत नाही. त्यात नव्याने आलेले सरकार खेळाडूंच्या बाबतीत नवीन परिपत्रक काढतात. त्यामुळे खेळाडूंची कोंडी होत आहे.

# कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धा: ब्राझीलचे आव्हान संपुष्टात

**। लास वेगास । वृत्तसंस्था ।**

तारांकित आक्रमकपटू व्हिनिशियस ज्युनियरच्या अनुपस्थितीचा ब्राझीलला मोठा फटका बसला आणि रविवारी उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत उरुग्वेकडून पराभव पत्करावा लागल्याने ब्राझीलचे कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.



नियमित वेळेतील गोलशून्य बरोबरीनंतर शूटआऊटमध्ये उरुग्वेने ४-२ अशी सरशी साधली. त्यामुळे १० व्यांदा कोपा अमेरिका जिंकण्याचे ब्राझीलचे स्वप्न आता पूर्ण होऊ शकणार नाही. यंदाच्या स्पर्धेत दोन वेळा पिवळे कार्ड मिळाल्याने व्हिनिशियसला उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत खेळता आले नाही. त्याच्या अनुपस्थितीत १७ वर्षीय प्रतिभावान आक्रमकपटू एन्ड्रिकला सुरुवातीपासून खेळण्याची संधी मिळाली. मात्र, अतिशय आक्रमकपणे खेळणाऱ्या उरुग्वेसमोर त्याला फारसा प्रभाव पाडता आला नाही. कोपा अमेरिका स्पर्धा ही त्यातील संघांच्या अतिशय आक्रमक आणि धसमुसळ्या खेळासाठी ओळखली जाते. ब्राझील आणि उरुग्वे यांच्यातील सामनाही अशाच पद्धतीने खेळला गेला. या सामन्यात तब्बल ४१ फाऊल झाले. ज्यापैकी २६ उरुग्वेने, तर १५ ब्राझीलने केले. तसेच ब्राझीलचा आक्रमकपटू रॉड्रिगोला धोकादायक पद्धतीने पाडल्यामुळे उरुग्वेच्या नाहितान नान्डेझला ७४ व्या मिनिटाला लाल कार्ड दाखवण्यात आले. त्यामुळे उर्वरित सामन्यात उरुग्वेला १० खेळाडूंनिशी खेळावे लागले. मात्र, त्यानंतरही ब्राझीलला उरुग्वेचा भक्कम बचाव भेदता आला नाही. दोन्ही संघांकडून गोलच्या संधी निर्माण करण्यापेक्षा प्रतिस्पर्धी संघाला रोखण्याचाच अधिक प्रयत्न झाला. त्यामुळे संपूर्ण सामन्यात दोन्ही संघांना मिळून केवळ चार फटके गोलच्या दिशेने मारता आले. ''आम्ही गोलच्या अतिशय थोड्या संधी निर्माण करू शकलो, याबाबत मी आनंदी आहे का, तर नक्कीच नाही. मात्र, विजय मिळवण्यासाठी जे आवश्यक होते ते केले,'' असे सामन्यानंतर उरुग्वेचे प्रशिक्षक मार्सेलो बिएल्सा म्हणाले.

निर्धारित वेळेतील निराशाजनक खेळानंतर अखेर सामन्याचा निकाल लावण्यासाठी पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला. यात उरुग्वेने ४-२ अशी बाजी मारताना उपांत्य फेरी गाठली. उरुग्वेला १९९२ पासून प्रथमच ब्राझीलविरुद्ध सलग दोन सामने जिंकण्यात यश आले आहे. गेल्या वर्षी विश्वचषक पात्रता फेरीतील सामन्यातही उरुग्वेने ब्राझीलला नमवले होते.

# विक्ट्री परडे पाहण्यासाठी चाहता झाडावर चढला

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

टीम इंडियाने मुंबईत गुरुवारी ४ जुलै रोजी विक्ट्री परेड काढली. ज्यात लाखो चाहते जमले होते. मुंबईचा मरीन ड्राइव्ह चाहत्यांच्या गर्दीने पूर्णपणे व्यापला होता. चाहत्यांना त्यांच्या हिरोला कसे तरी बघायचे होते. चॅम्पियन्स पाहण्यासाठी जिथे जागा मिळेल तिथे उभे सर्व उभे राहत होते. या सगळ्यामध्ये एक चाहता झाडावर चढला होता. यानंतर या चाहत्याची सर्वत्र चर्चा सुरू झाली होती. या चाहत्याचे नाव अवधेश शहा असे आहे. अवधेश मुंबईचा रहिवासी आहे. त्याला विराट कोहलीला जवळून पाहायचे होते. अवधेश हा विराट कोहली आणि रोहित शर्माचा खूप मोठा चाहता आहे. यासाठी तो झाडावर चढल होता.





## दक्षिण आफ्रिकेच्या १७७ धावा, ताजमिन ब्रिट्झचे अर्धशतक

# दुसरा महिला टी-२० सामना पावसामुळे अनिर्णित

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील महिला टी-२० मालिकेतील दुसरा सामना पावसामुळे अनिर्णित राहिला. रविवारी चेन्नईमध्ये पाहुण्या संघाने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी केली. सलामीवीर ताजमिन ब्रिट्झने सलग दुसऱ्या टी-२० मध्ये अर्धशतक झळकावले. तिच्या अर्धशतकाच्या जोरावर संघाने २० षटकांत ६ गडी गमावून १७७ धावा केल्या.**




### अनिके बोशने १६० चा स्कोअर पार केला

**दक्षिण आफ्रिकेने ११३ धावांवर ३ विकेट गमावल्या. इथून अनिके बोशने कमान हाती घेतली. तिच्यासमोर क्लो ट्रायॉन १२ धावा करून बाद झाली आणि नॅडिन डी क्लार्क १४ धावा करून बाद झाली. १९ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर ४० धावा करून बॉशही पॅव्हेलियनमध्ये परतली. तिने संघाची धावसंख्या १६० धावांच्या पुढे नेली. दक्षिण आफ्रिकेने ६ गडी गमावून १७७ धावा केल्या. पूजा वस्त्राकरने २ बळी घेतले. तर श्रेयंका पाटील आणि राधा यादव यांना प्रत्येकी १ बळी घेतला.**

दक्षिण आफ्रिकेकडून अँके बोशने ३२ चेंडूत ४० धावांची खेळी केली. भारताकडून पूजा वस्त्राकर आणि दीप्ती शर्माने २-२ बळी घेतले. पहिला डाव संपताच चेन्नईत पाऊस सुरू झाला. त्यामुळे भारताची फलंदाजी सुरू होऊ शकली नाही. दक्षिण आफ्रिका पहिला २० जिंकून मालिकेत १-० ने आघाडीवर आहे. तिसरा टी-२० सामना ९ जुलै रोजी चेन्नईत खेळवला जाईल. सलामीवीरांनी वेगवान सुरुवात केली. चेपॉक स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात सलामीवीरांनी दक्षिण आफ्रिकेला वेगवान सुरुवात करून दिली. कर्णधार लॉरा वोल्वार्ट आणि ब्रिट्झ यांनी अवघ्या ४ षटकांत ४३ धावा केल्या. वस्त्राकरने ५ व्या षटकात वोलवार्टला झेलबाद करून भारताला पहिले यश मिळवून दिले. कर्णधाराने २२ धावा केल्या. ब्रिट्झने अर्धशतक झळकावले.

# कुलदीप यादव बॉलिवूड अभिनेत्रीशी लग्न करणार?

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

कुलदीपने बॉलीवूड अभिनेत्रीसह लग्न करण्याच्या अफवांवर पडदा टाकला आहे. लग्नाबाबत सांगताना कुलदीप म्हणाला, ''तुम्हाला लवकरच माझ्या लग्नाची चांगली बातमी मिळेल, पण मी कोणत्या अभिनेत्रीशी लग्न करणार नाही.

महत्त्वाचे म्हणजे ती माझी आणि माझ्या कुटुंबाची काळजी घेणारी असली पाहिजे,'' असे कुलदीपने सांगितले. तो पुढे म्हणाला की, घरी परतल्यानंतर आपल्या माणसांना पाहून बरं वाटलं. विश्वचषक जिंकणं ही निश्चितच आनंदाची बाब आहे. हा चषक आमच्यापेक्षा आपल्या देशवासियांचा आहे. टी-२० विश्वचषकातील सुरूवातीच्या सामन्यांमध्ये कुलदीप यादवला खेळण्याची संधी मिळाली नाही. परंतु मोहम्मद सिराजला वगळण्यात आले. त्यानंतर कुलदीपचा प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश करण्यात आला. त्याने अप्रतिम खेळ केला.






कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)